रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २१६
www.ramprahar.com
शुक्रवार, २१ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

शेतकऱ्यांसाठी माजी आमदार सुरेश लाड यांचे आंदोलन/२
कोकणातील शेतकऱ्यांच्या सुचनांचा विचार करा/४
कळंबोलीत शिवरायांच्या भव्य कट्यारची प्रतिकृती/६

## आजपासून दहावीची परीक्षा; ड्रोनद्वारे होणार निगराणी



**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमातून राज्यभरात शुक्रवार (दि. २१)पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. या परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. यामध्ये आठ लाख ६४ हजार १२० मुले, सात लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली असून पाच हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार आहे. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून राज्यातील ७०१ केंद्रांतील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे, तर राज्यातील परीक्षा केंद्रावर जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे निगराणी राहणार आहे.

# भूगर्भातून गूढ आवाज अन् धक्के!

**पेण, पाली : प्रतिनिधी**

पेण आणि सुधागड तालुक्यात भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरल्याची घटना बुधवारी (दि. १९) रात्री घडली. या धक्क्यांमध्ये जीवित अगर वित्तहानी झालेली नाही, पण ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.




पेण शहरापासून १५ ते २० किमी अंतरावर असणाऱ्या वरवठणे, सायमाळ, तिलोरे, झापडी व सिंधळाचीवाडी येथे बुधवारी रात्री १०.१५च्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के बसले. यामुळे गावकरी एकत्र जमा झाले. यानंतर रात्री ११ ते ११.३० दरम्यान आणखी दोन धक्के बसले, तर पहाटे ३च्या सुमारास जमिनीला हादरा बसला. त्यामुळे ग्रामस्थ आणखी भयभीत झाले. तहसीलदार तानाजी शेजाळ व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी पाहणी करून माहिती घेतली.

सुधागड तालुक्यात महागाव, भोप्याचीवाडी, देऊळवाडी, कवेळीवाडीत जमिनीला हादरे बसले व भूगर्भातून आवाज आला. त्यामुळे घाबरलेले लोक रस्त्यावर आले. तहसीलदार उत्तम कुंभार यांनी गावांना भेट देत ग्रामस्थांशी चर्चा करून धीर दिला.

दरम्यान, या घटना भूकंप नसून याबाबत भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे यांच्यामार्फत सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी म्हटले आहे. या घटनेची भारतीय हवामान विभाग मुंबईनुसार तसेच कोयनानगर (जि. सातारा) येथील भूमापन केंद्रात भूकंपाची नोंद झाली नसल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

> **पेण आणि सुधागडात जमिनीला हादरे बसून भूगर्भातून आवाज आला. या घटनेत कुठलेही नुकसान झाल्याचे वृत्त नाही, पण अचानक झालेल्या या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हवामान विभागाच्या भूकंपमापन केंद्र किंवा संकेतस्थळावर याची नोंद नाही. यामुळे जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया संस्थेला सर्वेक्षण करण्याची विनंती करणार आहोत.**
>
> **–सागर पाठक, रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

## सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसलेंकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक अडथळे दूर करीत काही महिन्यांत पूर्णत्वास येणार आहे. या अनुषंगाने राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी गुरुवारी (दि. २०) मुंबई-गोवा महामार्गाचा पाहणी दौरा केला.

पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथून महामार्गाच्या पाहणी दौऱ्याला सुरुवात झाली. दरम्यान, राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले हे पहिल्यांदाच पनवेल तालुक्यात आले होते. त्यांचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा चिटणीस दीपक बेहेरे, चिटणीस अमरिश मोकल, पनवेल तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, प्रीतम म्हात्रे, रूपेश नागवेकर, केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, साई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल, किसान मोर्चाचे अतुल बडगुजर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पनवेल ते हातखंबा (रत्नागिरी) असा हा पाहणी दौरा होता. या संदर्भात मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत माहिती दिली.

## पराभवाला ईव्हीएम नाही; आपणच जबाबदार!

### मनसे नेते अमित ठाकरे यांची रोखठोक भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या पराभवासाठी ईव्हीएमला दोष देण्याऐवजी मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी पराभवासाठी आपणच जबाबदार असल्याचे वरळीतील मेळाव्यात सांगितल्याचे समजते.



२०२४मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवला. या निवडणुकीत मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पुत्र अमित ठाकरे यांना निवडणुकीत उतरवले होते, मात्र त्यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर वरळीतील मेळाव्यात काही पदाधिकाऱ्यांनी ईव्हीएम यंत्रणेस दोष देण्याचा प्रयत्न केला. त्यावर अमित यांनी, पराभवासाठी आपणच जबाबदार आहोत असे माझे स्पष्ट मत आहे. पराभवाला ईव्हीएम यंत्रणा जबाबदार असेल असे पक्षातीलच पदाधिकाऱ्यांचे मत असेल तर ते सिद्ध करून दाखवा, असे आव्हानच दिले.

विधानसभा निवडणुकीतील अपयशाचे खापर एकमेकांवर फोडणाऱ्या विभाग अध्यक्षांनाही अमित यांनी खडे बोल सुनावले. पदाची जबाबदारी पेलवत नसेल तर पदाचा राजीनामा द्यावा आणि ज्यांना काम करायचे आहे त्यांना संधी द्यावी, असे त्यांनी ठणकावून सांगितल्याचे समजते.

## चार महिला नक्षली चकमकीत ठार

**गोंदिया : प्रतिनिधी**

बालाघाट जिल्ह्यात हॉकफोर्स आणि पोलीस दल जंगल परिसरात शोधमोहीम राबविताना रोंडा फॉरेस्ट कॅम्पजवळ नक्षलवाद्यांशी बुधवारी चकमक झाली. यामध्ये चार महिला नक्षलींचा खात्मा करण्यात आला आहे.

यातील एकीवर २० लाख तर इतर तिघींवर प्रत्येकी १४ लाखांचे इमान होते. त्यांच्याकडून रायफल्स आणि दैनंदिन वापरातील वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.



# उलवे नोडमध्ये शिवशाही अवतरली!

## शिवजयंतीनिमित्त महाराष्ट्राची महासंस्कृती कार्यक्रम सादर

### शिवराज्याभिषेक सोहळ्यातून गौरवशाली परंपरेला उजाळा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्राची महासंस्कृती या कार्यक्रमात राज्याच्या लोककला, लोकसंगीत, कोळीगीत, गण गवळणी, लावणी, पालखी, अभंग, पोवाडा, बहुरंगी संगीत आणि नृत्य रचनांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. विशेषतः या वेळी सादर झालेला शिवराज्याभिषेक सोहळा महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव देऊन गेला.

या कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्या वतीने समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात करण्यात आले होते.




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

या अनुषंगाने महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित या मराठमोळ्या कलाविष्कारातून छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांची सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, समितीचे सरचिटणीस व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, वर्षा प्रशांत ठाकूर, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, वैभव देशमुख, भाजपचे खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष वसंतशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, व्ही.के. ठाकूर, रघुनाथ देशमुख, स्वप्नील ठाकूर, राज ठाकूर, पायलट प्राप्ती ठाकूर, कामगार नेते संजय भगत, विभागीय अध्यक्ष विजय घरत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, **(पान २ वर..)**

## निवडक

### केंद्र सरकारकडून ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी नियमावली

**नवी दिल्ली :** पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाने इंडियाज गॉट लॅटेंट या शोमध्ये केलेल्या अश्लील वक्तव्यानंतर आता केंद्र सरकारने ओटीटी (ओव्हर-द-टॉप) मीडिया प्लॅटफॉर्मसाठी नियमावली सादर केली आहे. त्यांना कंटेंटचे वय-आधारित वर्गीकरण करण्यास आणि स्वयं-नियमन (चेतावणी देण्याबाबत) सुनिश्चित करण्याचे आदेश देण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणे दंडनीय असेल.

### सुवर्णपदक विजेत्या खेळाडूचा सरावादरम्यान दुर्दैवी मृत्यू

**बिकानेर :** राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती पॉवरलिफ्टर यष्टिका आचार्य (वय १७) हिचा जिममध्ये सराव करताना दुर्दैवी मृत्यू झाला. यष्टिका बिकानेरमधील नत्थूसर गेटजवळ असलेल्या जिममध्ये नेहमीप्रमाणे सराव करीत असताना तिच्या मानेवर २७० किलोचा रॉड पडला. यष्टिकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तिला मृत घोषित केले गेले.

# दिल्लीत पुन्हा महिलाराज!

## रेखा गुप्ता यांनी घेतली सीएमपदाची शपथ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजप नेत्या, आमदार रेखा गुप्ता यांनी गुरुवारी (दि. २०) राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत रामलीला मैदानावर हा शपथविधी सोहळा झाला.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह उपमुख्यमंत्री परवेश शर्मा आणि सहा मंत्र्यांना दिल्लीचे नायब राज्यपाल एलजी विनयकुमार यांनी पद व गोपनियतेची शपथ दिली. शालीमार बाग विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री बनल्या आहेत. यापूर्वी सुषमा स्वराज (भाजप), शीला दीक्षित (काँग्रेस), आतिशी मार्लेना (आम आदमी पक्ष) यांनी दिल्लीच्या महिला मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला होता.

माजी मुख्यमंत्री व आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना पराभूत करणारे परवेश शर्मा उपमुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत, तर अन्य पाच आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये आशीष सूद, मनजिंदर सिंह सिरसा, रवींद्र सिंह इंद्राज, कपिल मिश्रा आणि पंकज सिंह यांचा समावेश आहे.

शपथविधी सोहळ्याला भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, प्रमुख नेतेगण उपस्थित होते.

## टीम इंडियाची विजयी सलामी






**दुबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेतील बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या सामन्यात भारताने शानदार विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेश संघाचा डाव ४९.४ षटकांत २२८ धावांमध्ये संपुष्टात आला होता. भारताच्या मोहम्मद शमीने पाच बळी टिपले. हे आव्हान भारताने सहा गडी राखून ४६.३ षटकांत पार केले. भारताकडून शुबमन गिलने एक बाजू लावून धरत नाबाद शतकी खेळी केली.

## कृषीमंत्री कोकाटे हायकोर्टात जाणार

**नाशिक : प्रतिनिधी**



कागदपत्रांमध्ये फेरफार करून फसवणूक केल्याचा आरोपाखाली राष्ट्रवादीचे नेते व राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची तुरूंगवासाची शिक्षा व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दरम्यान, यावर मंत्री कोकाटे यांनी प्रतिक्रिया देत उच्च न्यायालयात जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

ना. कोकाटे म्हणाले की, १९९५च्या जुन्या राजकीय वैरातून तत्कालीन राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांनी माझ्यावर ती केस केली होती. नंतरच्या काळात दिघोळे आणि माझे चांगले संबंध तयार झाले. मी रितसर जामीनही घेतला. नियमाने कायद्यानुसार जे काही करता येईल ते केलेले आहे. या केसचा निकाल आज ३० वर्षांनी लागला आहे. न्याय मागण्याचा अधिकार नागरिक म्हणून मला आहे. म्हणून या संदर्भात मी हायकोर्टात जाणार आहे.

## होळीनिमित्त कोकणवासीयांसाठी विशेष रेल्वेगाड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईस्थित कोकणवासीय होळीनिमित्त कोकणातील मूळगावी जाण्याच्या तयारीत आहेत. कोकणात जाणाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरून विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन केले आहे.

होळीनिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या समन्वयाने रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. सीएसएमटी-मडगाव, एलटीटी-मडगाव अशा रेल्वेगाड्या आहेत. कोकण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ०११५१ सीएसएमटी-मडगाव विशेष रेल्वेगाडी सीएसएमटीवरून ६ मार्च, १३ मार्च रोजी मध्यरात्री १२.२० वाजता सोडण्यात येणार आहे. ही रेल्वेगाडी अनुक्रमे ७, १४ मार्च रोजी दुपारी १.३० वाजता मडगाव येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११५२ मडगाव-



सीएसएमटी विशेष रेल्वेगाडी मडगाव येथून ६ मार्च, १३ मार्च रोजी दुपारी २.१५ वाजता सोडण्यात येणार असून ही रेल्वेगाडी त्याच दिवशी मध्यरात्री ३.४५ वाजता सीएसएमटीला पोहचेल.

या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवी या रेल्वे स्थानकांवर थांबा असेल. या रेल्वेगाडीला एकूण २४ डबे असतील.

गाडी क्रमांक ०११२९ लोकमान्य टिळक टर्मिनस-मडगाव १३ मार्च, २० मार्च रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून रात्री १०.१५ वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी अनुक्रमे १४ मार्च आणि २१ मार्च रोजी दुपारी १२.४५ वाजता मडगाव येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०११३० मडगाव-लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष रेल्वेगाडी १४ मार्च, २१ मार्च रोजी मडगाव येथून दुपारी १.४० वाजता सुटेल. ही रेल्वेगाडी २२ मार्च रोजी पहाटे ४.०५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी आणि करमळी स्थानकांवर थांबा असेल.

या रेल्वेगाड्यांचे तिकीट आरक्षण २४ फेब्रुवारी रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसी या संकेतस्थळावर सुरू होईल, अशी माहिती कोकण रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथे भव्य स्मारक उभारणार -मुख्यमंत्री फडणवीस

## ◆ लाल किल्ल्यात शिवजन्मोत्सवाचा सोहळा उत्साहात



**आग्रा : वृत्तसंस्था**

आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांना ज्या रामसिंगच्या कोठीत ठेवण्यात आले होते ती सध्याच्या मीनाबाजार भागातील जागा महाराष्ट्र सरकार अधिग्रहित करणार असून तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्रा येथे केली. यासंदर्भात आपण उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शिवजयंतीनिमित्ताने आग्रा येथील ऐतिहासिक लाल किल्ला येथे अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'शिवजन्मोत्सव भारतवर्ष का' या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या अनोख्या महोत्सवाच्या आयोजनाचे हे तिसरे वर्ष आहे. यावेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री एस. पी. सिंग बघेल, उत्तर प्रदेशचे उच्च शिक्षण मंत्री योगेंद्र उपाध्याय, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, फतेहपूर सिक्रीचे खासदार राजकुमार चहर, आग्र्याच्या महापौर हेमलता कुशवाह, आग्रा जिल्हा पंचायत अध्यक्षा डॉ. मंजू भदौरिया, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आमदार परिणय फुके यांच्यासह छावा या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणारे अभिनेते विकी कौशल, या चित्रपटाचे निर्माते नितीन विजन, कार्यक्रमाचे आयोजक व प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील आदी उपस्थित होते.

आग्रा येथे शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे महत्त्व आणि औचित्य अत्यंत अभिमानास्पद असून हा उपक्रम सर्व शिवप्रेमींना ऊर्जा देणारा असल्याचे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आग्रा येथे महाराजांनी दाखवलेला स्वाभिमान प्रेरणादायी असून या सुटकेनंतर महाराजांनी पुन्हा नव्याने स्वराज्य उभे केले. परकीयांचे दुराचारी शासन संपुष्टात आणून हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीची प्रेरणा राजमाता जिजाऊंनी महाराजांना दिली, स्वराज्याची स्थापना करणारे शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. ते उत्तम प्रशासक, महिलांच्या सन्मानाचे रक्षणकर्ते होते. महाराष्ट्राचे समाजभान महाराजांनी जागे केले. समाजातील विविध छोट्या घटकांना, बारा बलुतेदार जातीसमूहांना एका सूत्रात गुंफून त्यातून इमान जपणारे लढवय्ये मावळे उभे केले. जे देव, देश आणि धर्मासाठी निष्ठेने लढल्याने जगात आदर्शवत असे हिंदवी स्वराज्य उभे राहिले. देशाची सूत्रे हाती घेतल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही रायगडावर येऊन प्रेरणा घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार आम्ही वाटचाल करत असून बलशाली भारत आणि बलशाली महाराष्ट्र निर्माण करण्याचा आमचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

छत्रपती संभाजी महाराजांचा योग्य आणि जाज्वल्य इतिहास समोर आणल्याबद्दल छावा चित्रपटाचे निर्माते अभिनंदनास पात्र असल्याची प्रशंसा मुख्यमंत्र्यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबऱ्या वाचून आपण प्रभावित झाल्याचे सांगून केंद्रीय मंत्री बघेल म्हणाले, या उपक्रमामुळे राष्ट्रभावना निर्माण होण्यास मोठी मदत होईल. महाराजांच्या शौर्य आणि धाडसामुळे या पुढील काळात आग्रा हे शिवाजी महाराजांच्या नावानेही ओळखले जाईल . तसेच मुंबई –आग्रा हा महामार्ग या पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ओळखला जावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून, पाठबळातून हा अनोखा कार्यक्रम साकारल्याचे सांगून सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार म्हणाले, महाराजांच्या जीवनातील एकेका प्रसंगावर महानाट्य तयार होऊ शकते इतके ते प्रेरणादायी आहेत. आग्रा येथून महाराजांनी सुटका करून घेतलेला दिवस हा युक्ती दिवस म्हणून साजरा करण्यात येईल असे अशी घोषणा त्यांनी केली.कार्यक्रमापूर्वी येथील महिला भगिनींनी औक्षण करत मुख्यमंत्र्यांचे आत्मीयतेने स्वागत केले.

# शेतकऱ्यांसाठी सुरेश लाड यांचे पोलीस ठाण्याच्या पायरीवर झोपून आंदोलन



**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

शांत, संयमी समजले जाणारे कर्जतचे माजी आमदार भाजप नेते सुरेश लाड हे शेतकऱ्यांसाठी अधिकाऱ्यांच्या विरोधात आक्रमक झाले असून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गुरुवार (दि. २०) रोजी कर्जत पोलीस ठाण्याच्या पायरीवर झोपून आंदोलन सुरू केले पोलीस अधिकाऱ्यांच्या विरोधात लाड यांनी उचललेल्या या पावलामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायत हद्दीत नांगुर्ले–तिघर–वर्णे परिसरात कल्पतरू कंपनीचा बंगलो प्लॉटिंगचा सुमारे १५० एकर जमिनीमध्ये गृहप्रकल्प बांधण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, कंपनीने येथील शेतकऱ्यांना विचारात न घेता परस्पर जागा हडप केल्याचा आरोप बाधित शेतकऱ्यांनी केला होता तर कंपनीने आपलीं जागा शासकीय नियमानुसार मोजून घ्यावी म्हणून शेतकरी सांगत आहेत, परंतु कंपनी मुजोरगिरी वापरत पोलीस प्रशासन व महसूल विभागाला हाताशी धरून शेतकऱ्यांवर दबाव आणत आहेत.

> **चार वर्षे आम्ही आमच्या हक्काच्या मागणीसाठी लढा देतो. कंपनी आमच्यावर दादागिरी, हुकूमशाही वापरत असून पोलीस प्रशासनाला हाताशी धरून आमच्यावर दबाव आणत आहे. कंपनीने १५ वर्षापूर्वी जागा प्रायव्हेट सर्वे करून मोजणी केली. आता कंपनी जिथे जागा पाहिजे तिथे शेतकऱ्यांच्या जागा बळकावत असून शेतकऱ्यांवर दबाव टाकत आहे**
>
> **–पांडुरंग शिर्के,** शेतकरी

या वेळी लाड यांनी जो पर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही किंवा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक भेटायला येत नाही तोपर्यंत आपण आंदोलन सोडणार नाही म्हणून सांगितले.दरम्यान, लाड यांच्या आंदोलन ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अगा खान एजन्सी फॉर हॅबिटॅट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक २१ व २२ फेब्रुवारी या दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे.

या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी व प्रशिक्षणासाठी अमृता पराडकर कार्यक्रमाधिकारी या उपस्थित राहणार असून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाविषयी मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. या दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेमध्ये व प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रात्यक्षिक करून दाखवली जाणार आहेत तसेच एखादी आपत्ती आल्यानंतर त्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे याविषयी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण तसेच माहिती दिली जाणार आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना या कार्यशाळेचा व प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी विनंती व आवाहन केले आहे.

# 'पोस्को महाराष्ट्र स्टील'ने महिलांना दिली उद्योजक होण्याची संधी



**माणगाव : बातमीदार**

शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या वतीने दहिवली परिसरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले, ज्यामध्ये अहिल्या महिला मंडळ, पेण येथे अभ्यासदौरा आणि नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात कापड वाटप या दोन उपक्रमांचा समावेश होता.

दहिवली आणि परिसरातील पाच गावांतील १७ महिलांना अहिल्या महिला मंडळाच्या अभ्यासदौऱ्यात सहभागी होण्याची संधी मिळाली. या भेटीदरम्यान महिलांना व्यवसाय विकास, उद्योजकतेच्या संधी आणि शाश्वत उपजीविकेच्या विविध पर्यायांबद्दल सखोल मार्गदर्शन मिळाले.

अभ्यासदौऱ्याबरोबरच, पोस्को महाराष्ट्र स्टीलने दहिवली गावातील महिलांना नव्याने सुरु केलेल्या उद्योगासाठी भांडवल स्वरुपात ३५०० मीटर कापडाचे वाटप केले. या कापडाचा उपयोग कापडी पिशव्या तयार करण्यासाठी केला जाईल. या उपक्रमामुळे महिलांना स्वयंरोजगार निर्माण करण्याची संधी मिळेल आणि पर्यावरणपूरक व्यवसायांना चालना मिळेल. यामुळे महिलांना आपला व्यवसाय सुरू करता येईल आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल उचलता येईल. हा कार्यक्रम १९ फेब्रुवारी रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलचे वरिष्ठ अधिकारी जी युन पार्क आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या संधीबद्दल महिलांनी उत्साह व्यक्त करत पोस्कोच्या या उपक्रमामुळे त्यांना उद्योजकतेच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. सहभागी महिलांनी व्यक्त केले

# घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मुंब्रा महामार्गावरील पापडीचा पाडा या गावामध्ये पहाटे झालेल्या घरफोडीत चोरट्यांनी अडीच लाख रुपये किमतीचे दागिने लंपास केले. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात रितसर दोन लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे.

मनीष बागडे यांच्या घऱात स्वयंपाक खोलीतील खिडकीचे गज वाकवून घरात प्रवेश केला. बागडे यांनी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने आणि लहान बालकांची पैसे साठविण्याच्या गल्ल्यातील रोख रक्कम असा ऐवज चोर घेऊन पसार झाले.

# दुकानाचे लॉक तोडून किमती ऐवजाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

दुकानाचे लॉक तोडून अज्ञात चोरट्यांनी महत्वाचा किंमती ऐवज चोरुन नेल्याची घटना तळोजा येथे घडली आहे.

जुबेर फॅब्रिकेशन या वेल्डींग दुकानाचे अज्ञात चोरट्याने लॉक तोडून त्यामध्ये असलेले किमती वेल्डींग मशिन, ग्राईंडर, केबल, ड्रील मशिन असा हजारो रुपये किंमतीचा माल चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रसायनी डॉक्टर्स संघटना आणि मोरया ग्रुपतर्फे शिवजयंती




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती चे औचित्य साधत १९ फेब्रुवारी २०२५ रोजी महादेव मंदिर, रसायनीतील वात–कांबे येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले, रसायनी डॉक्टर्स संघटना(झठ्खच–),मोरया ग्रुप(कांबे) आणि श्री साई ब्लड बँक (पनवेल) यांच्या संयुक्त विद्यमनाने हे शिबिर घेण्यात आले.

स्वराज्यासाठी रक्त सांडवण्याऱ्या मावळ्यांचा वारसा पुढे चालवण्याची ही एक संधी आहे तसेच रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे या भावनेने प्रेरित होऊन प्रायमा चे डॉक्टर्स व मोरया ग्रुप च्या सदस्यांनी उत्स्फूर्तपणे यात सहभाग घेतला.सुमारे ५० रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले.या रक्तदान शिबिरा नंतर मोहोपाडा मार्केट येथील शिवाजी पुतळा येथे हार अर्पण करून प्रायमा तर्फे शिवजयंती जल्लोषा त साजरी करण्यात आली.

# भाजप व नरेशदादा युवा प्रतिष्ठान आयोजित हळदीकुंकू सोहळ्यास महिलांचा प्रतिसाद

## सुरेखा अलीमकर ठरली स्कुटी गाडीची मानकरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी ढेकू व नरेशदादा युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सवाचे औचित्य साधून महिलांसाठी हळदीकुंकू सोहळा व खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सिनेअभिनेते क्रांतीनाना मालेगावकर व बाल कलाकार अभिनेत्री सह्याद्री मालेगावकर यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमात भरघोस बक्षिसे देण्यात आली. त्याचबरोबर हळदीकुंकू सभारंभासाठी आलेल्या महिला भगिनींना हळदीकुंकू वाण साडी भेट देण्यात आली. स्पर्धेतील मुख्य आकर्षक लकी ड्रॉच्या माध्यमातून कूपन काढण्यात आले होते. या वेळी सुरेखा आलीमकर या महिलेला लकी ड्रॉच्या माध्यमातून स्कुटी गाडी भेट देण्यात आली.

खेळ रंगला पैठणी कार्यक्रमात विभूती सौरव दहिफळे साजगाव प्रथम बक्षीस एलईडी टीव्ही व पैठणी, द्वितीय मोनाली रोहिदास पाटील बक्षीस शेगडी, तृतीय क्रमांक प्रणिता तेजस बोर्ले बक्षीस कुलर, चतुर्थ क्रमांक शीतल पुनीत पाटील बक्षीस मिक्सर, पाचवा क्रमांक लीना मंगेश पाटील बक्षीस कुकर देण्यात आले. या वेळी खालापूर तालुक्यातील ऋतिका पाटील मिस खोपोली व भाग्य दिले तू मला कलर्स मराठी फेम शिवण्या बोराडे, लिटिल रिलस्टार व हभप सचिनमहाराज तांडेल शुभ विवाह झी मराठी फेम यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार सुरेश लाड, भाजप उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत विधानसभा प्रमुख किरण ठाकरे, सरचिटणीस उत्तर रायगड भाजप दीपक बेहरे, खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव, राजेश लाड, संदीप पाटील, सरपंच प्रकाश पाटील, विनोद खवले, अनंता पाटील, रवींद्र पाटील खालापूर तालुका सरचिटणीस हरिभाऊ जाधव, शहर अध्यक्ष खालापूर दीपक जगताप, रमेश रेटरेकर, हेमंत नांदे, सुजाता दळवी खालापूर तालुका अध्यक्ष, निकिता हेलंडे, श्वेता मनवे, स्नेहल सावंत, विकास रसाळ, भालचंद्र पाटील ग्रामपंचायत सदस्य, प्रवीण मनवे, राजू पाटील, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.



पान १ वरुन

# उलवे नोडमध्ये शिवशाही अवतरली!

वामन म्हात्रे, हेमंत ठाकूर, सी.के. ठाकूर, रघुनाथ ठाकूर, जयेश ठाकूर, स्नेहलता ठाकूर, कमलाकर देशमुख, सुहास भगत, किशोर पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, मदन पाटील, गणेश जगताप, शैलेश भगत, योगिता भगत, किशोर पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शिवराज्याभिषेक सोहळा हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सोहळा, जो ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर पार पडला. या ऐतिहासिक सोहळ्यात महाराजांना छत्रपती म्हणून विधीवत घोषित करण्यात आले. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित महाराष्ट्राची महासंस्कृती या कार्यक्रमात शिवराज्याभिषेक सोहळा सादर करण्यात आला. या सादरीकरणाद्वारे उपस्थितांना महाराजांच्या सुवर्णकाळाचा अनुभव देण्यात आला.

महाराष्ट्राची महासंस्कृती ही अनेकविध परंपरा, इतिहास, कला, साहित्य, लोकजीवन आणि चालीरीतींनी समृद्ध आहे. संस्कृती विविधतेने नटलेली असून संत परंपरा, लोककला आणि आधुनिक विचारसरणीचा प्रभाव कायम राहिलेला आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा राज्य पुढे नेत आहे. शिवरायांच्या विचाराचा प्रभाव महाराष्ट्रसह देश आणि परदेशातही आहे. त्यामुळे शिवजयंतीच्या निमित्ताने झालेल्या रत्नकांत जगताप व सुभाष नकाशे प्रस्तुत महाराष्ट्राची महासंस्कृती या कार्यक्रमातून राज्याच्या गौरवशाली परंपरेचा आदर अधोरेखित झाला.

या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास पंचक्रोशीतील हजारो शिवप्रेमी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रसिद्ध सूत्रसंचालक स्मिता गव्हाणकर यांनी केले.

# उरणमध्ये रक्तदान शिबिर



**उरण : बातमीदार**

दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग तर्फे शिवजन्मोत्सव निमित्त श्रीछत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा जवळ, विमला तलाव, उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

५५ रक्त दात्त्यांची नाव नोंदणी झाली त्यापैकी एकूण ३५ जणांचे रक्तदान झाले. सामाजिक कार्यकर्ते अशोक गावंड व अजित म्हात्रे यांच्या हस्ते शिव प्रतिमा व गणेश पूजन झाले.

सूत्रसंचालन राजेंद्र ठाकूर यांनी केले. दुर्ग मावळा प्रतिष्ठान उरण विभाग अध्यक्ष राज म्हात्रे, उपाध्यक्ष मनिष पाटील आदींनी मेहनत घेतली. श्री साई ब्लड बँक पनवेलचे मोलाचे सहकार्य या रक्तदान शिबिराला लाभले.

## निवडक

### बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन



**पनवेल :** मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेला आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त रविकिरण घोडके, सचिव अक्षय कदम, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### फणसवाडीत शिवजयंती उत्साहात

**पनवेल :** जिल्हा परिषद शाळा, फणसवाडी आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती फणसवाडी येथे साजरी झाली. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद मोरे, विशेष कार्यकारी अधिकारी व गुणवंत कामगार, शाळेच्या शिक्षिका नेहा गावंड, सविता सरगर, शाळा व्यवस्थापन सदस्य पालक समिती बाळू भगत, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल केंद्र प्रमुख विद्यानंद कदम व सतीश पारधे उपस्थित होते.



# शाळा, महाविद्यालयांमध्ये शिवजयंती उत्साहात

## सीकेटी कॉलेज, खांदा कॉलनी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज येथे जिमखाना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती बुधवारी (दि.१९) महाविद्यालाच्या प्रांगणात साजरी करण्यात आली.



या कार्याक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. ए.व्ही. पाटील यांनी केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांची सांगड वर्तमान काळाबरोबर घालून त्याचे महत्त्व विषद केले.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस हार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक व सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. गणेश जगताप तसेच सर्व विद्याशाखांचे शाखाप्रमुख, सर्व विभागांचे प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी, सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्र गीत' व 'शिव गर्जना' सादर केली. एन.सी.सी. विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात 'शिव-दिंडी काढून कार्यक्रमाची सांगता केली. सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सांस्कृतिक विभागाचे समन्वयक, प्रा. गणेश जगताप आणि एन.सी.सी. विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यु. टी भंडारे, व सर्व समित्यांच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे येथे जे.बी.एस.पी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिवप्रतिमेस पुष्पहार घालून मानवंदना दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका चष्मिंदर कौर बक्षी, शाळेच्या समन्वयिका कविता म्हात्रे, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवप्रतिमेस वंदना केली.



## पनवेल-उरण आगरी समाज मंडळातर्फे शिवजयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळातर्फे शिवजयंती मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष अतुल दि.बा पाटील यांनी मंडळाच्या महात्मा फुले सभागृहाच्या प्रांगणात मंचावर विराजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास सचिव बी.पी म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर, सदस्या मनीषा अतुल पाटील व कार्यकारणी सदस्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

दरम्यान, महापालिका मिरवणूकीत आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका आयुक्त मंगेशजी चितळे यांनी मंडळाच्या प्रांगणातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, जयवंत पगडे, जगदीश गायकर, संदिप पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे डी.टी. जाधवसर, काशिनाथजी जाधव, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, कापसे, गोसावी मॅडम, महापालिका उपायुक्त, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिकांनी महाराजांना पुष्प अर्पण करून आदरभाव व्यक्त केला.

मिरवणुकीत मंडळातर्फे चहा, नाश्ता, पाणी वाटप मंडळाच्या सदस्या मनीषा अतुल पाटील, बी. पी. म्हात्रे, विजय गायकर, विद्याधर पाटील यांनी केले.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेलमध्ये शिवजयंती पारंपारिक पद्धतीने मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून व लेझीम ढोल व ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत शिवजयंती निमित्त मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम व सर्व प्राध्यापक तसेचप्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होते. शिवजयंती निमित्त महाविद्यालयात संभाजीराव बाबुराव भोसले यांच्या सन्मानार्थ विविध नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या नाट्यस्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले.



स्त्री उत्कृष्ट अभिनय पुरुष उत्त्कृष्ट अभिनय यांची निवड करून सर्वांना प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. या नाट्यस्पर्धेचे निळकंठ भुरे व जीवन राठोड यांनी परीक्षक म्हणून मूल्यांकन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक डॉ. उज्वला डोणे यांनी केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व प्रथम त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी खऱ्या अर्थाने धर्म निरपेक्ष आणि सर्व सामान्य रयतेचे राज्य निर्माण केल्याचे सांगून त्यांनी निर्माण केलेली राज्य व्यवस्था आजही जगातील सर्व राष्ट्रांना प्रेरणा देणारी असल्याचे सांगितले.

महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व नितीन वास्कर यांनी केले तसेच स्टाफ वेल्फेअर समितीतील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी उपस्थित राहुन सहकार्य केले.



# पनवेल परिसरात शिवजयंती उत्साहात; ठिकठिकाणी कार्यक्रम









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती बुधवारी (दि.१९) संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली रायगड जिल्ह्यातील पनवेल, कामोठे, खारघर, नवीन पनवेल आणि खांदा कॉलनी येथे महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

पनवेल परिसरात ठिकठिकाणी शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल महानगरपालिकेचे सभागृह येथे परेश ठाकूर आणि भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष अनिल भगत यांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी आयोजित केलेल्या शिवजयंतीला भेट देत शिवरायांना वंदन केले.

या वेळी खारघर शहराध्यक्ष प्रवीण पाटील, अमरीष मोकल, ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, नेत्रा पाटील, कामगार नेते मोतीलाल कोळी, भीमराव पवार, संतोष जाधव, अभिषेक भोपी, साधना पवार, नितेश पाटील, दीपक शिंदे, संतोष शर्मा, आरती नवघरे, हर्षदा उपाध्येय, किर्ती नवघरे, किरण पाटील, अमर उपाध्याय, कंचन कुमार बिर्ला यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

**पनवेल :** शिवजयंतीनिमित्त उसर्ली येथील महालक्ष्मी गार्डन, साईच्छा पार्क, दीप सिटी, तळोजा फेस २ येथील मारवा सोसायटी, खारघर येथील शिल्प चौक या ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेटी दिल्या. सर्व ठिकाणी आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी नगरसेवक हरेश केणी आदी उपस्थित होते.













**पनवेल :** शिवजयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने काढण्यात आलेल्या मिरवणुकीमध्ये सहभागी नागरिकांना केक आणि सरबतचे वाटप करण्यात आले. पत्रकार वसीम पटेल आणि कच्छी हलिमाबाई झुलेवाली ट्रस्टचे मुख्य विश्वस्त हनिफ इस्माईल यांनी राबविलेल्या या उपक्रमामध्ये आमदार प्रशांत ठाकूरही सहभागी झाले होते.

## संपादकीय

# दिल्ली पुन्हा स्त्रीशक्तीकडे!

विधानसभा काबिज करुन दिल्लीत २७ वर्षांनी सत्ता स्थापन केल्यानंतर भारतीय जनता पक्षाने रेखा गुप्ता यांच्याकडे मुख्यमंत्रीपद दिले आहे. यंदाच्या दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये रेखा गुप्ता या प्रथमच आमदार म्हणून विजयी झाल्या आहेत. असे असताना त्यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याने काही भिवया उंचावल्या असल्या तरी, भाजपने या निवडीतून राजकारणात महिलांना सक्षम करण्याचा प्रभावी संदेश दिला आहे. रेखा गुप्ता या पक्षातील तळागाळातील व स्वच्छ प्रतिमेच्या नेत्या आहेत.

**सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी यांच्यानंतर रेखा गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत. शालिमार बागेच्या आमदार असणाऱ्या रेखा गुप्ता यांनी गुरुवारी ऐतिहासिक रामलीला मैदानावर एका मोठ्या समारंभात दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. यापूर्वी मदनलाल खुराना, साहिबसिंग वर्मा आणि सुषमा स्वराज या भाजप नेत्यांनी दिल्लीचे नेतृत्व केले आहे. रेखा गुप्ता यांनी शालीमार बाग येथून आम आदमी पक्षाच्या तीन वेळा आमदार राहिलेल्या बंदना कुमारी यांचा २९ हजारहून अधिक मतांनी पराभव केला. वैश्य समुदायाशी संबंधित रेखा गुप्ता या १९९२ मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये सामील झाल्या. त्यांना एकंदर ३० वर्षांचा राजकारणाचा अनुभव आहे. आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे देखील गुप्ता यांच्या वैश्य समाजातीलच आहेत. 'आप'चा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला असला तरी त्या पक्षाचे दिल्लीतील पूर्वांचली आणि वैश्य–बनिया समुदाय तसेच महिला मतदारांवर प्रभाव कायम आहे असे म्हटले जाते. गुप्ता यांची मुख्यमंत्रीपदी निवड करून भाजपने दिल्लीतील केजरीवाल यांच्या उरल्यासुरल्या प्रभावाला शह दिला आहे. भाजपच्या या रणनीतीमुळे भविष्यात केजरीवाल यांना आपल्या समर्थक मतदारांना टिकवून ठेवणे कठीण जाणार आहे. दिल्लीच्या यापूर्वीच्या मुख्यमंत्री, 'आप'च्या आतिशी यांना 'तात्पुरत्या मुख्यमंत्री' मानले जात होते. रेखा गुप्ता यांना मात्र मुख्यमंत्री पदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याची संधी मिळेल. दिल्लीच्या मुख्यमंत्री पदासाठी वास्तविक नवी दिल्ली मतदारसंघात अरविंद केजरीवाल यांचा पराभव करणारे परवेश वर्मा यांचे नाव आघाडीवर होते. परंतु ते दिल्लीचे माजी मुख्यमंत्री साहिबसिंग वर्मा यांचे पुत्र आहेत. त्यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली असती तर विरोधकांकडून घराणेशाहीच्या मुद्यावरून जोरदार टीका झाली असती. याउलट रेखा गुप्ता यांना दिल्लीतील नागरी समस्यांची चांगली जाणीव आहे. देशाची राजधानी असलेले दिल्लीसारखे शहर जगातील सर्वाधिक वायू प्रदूषणाचे शहर म्हणून कुप्रसिद्ध झाले आहे. दिल्लीतील वायू प्रदूषण आणि यमुनेची स्वच्छता हा निवडणूक प्रचारादरम्यान मोठा चर्चेचा मुद्दा होता. रेखा गुप्ता यांच्या सरकारला या प्रश्नांना प्राधान्य द्यावे लागेल. त्याखेरीज निवडणुकीत पक्षाने दिलेल्या आश्वासनानुसार पात्र महिला लाभार्थींना दरमहा २५०० रुपये देण्यासाठी लवकरच योग्य यंत्रणा उभी करावी लागणार आहे. तसेच गर्भवती महिलांसाठी २१ हजार रूपयांची तरतूद करण्यासाठी आगामी अर्थसंकल्पाचा आराखडा करावा लागणार आहे. आतापर्यंत दिल्लीत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि दिल्लीचे केजरीवाल सरकार असा संघर्ष दिसत होता. दिल्लीच्या विकासाच्या मार्गातील हा अडथळा आता दूर झाला आहे. त्यामुळेच दिल्लीला जगातील सर्वोत्तम राजधानींपैकी एक बनवण्याच्या संकल्पाच्या दिशेने रेखा गुप्ता काम करतील असा विश्वास व्यक्त होतो आहे.**

# कोकणातील शेतकऱ्यांच्या सुचनांचा विचार करा





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

राज्याचे नवीन कृषी धोरण ठरविण्यासाठी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे विभागवार आढावा बैठका घेत आहेत. तेथील प्रगतीशील शेतकर्यांवशी संवाद साधत आहेत. त्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातलाच एक भाग म्हणून कोकण विभागाची ही बैठक १० फेबुवारी २०२५ रोजी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या नियोजन भवन सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या संवाद बैठकीला ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रगतीशील शेतकरी सहभागी झाले होते. यावेळी कोकणातील शेतकर्यांनी आपल्या समस्या मांडल्या. काही सूचना केल्या. कोकण कृषि विद्यापीठाच्या कामकाजाबद्दल नाराजी व्यक्त केली. कोकणातील शेतकर्यांनी ज्या समस्या मांडल्या आहेत. त्यांचा विचार शासनाने केला पाहिजे. काही योजनांसाठी जे निशकर्ष उर्वरीत महाराष्ट्राला लावलले जातात तेच कोकणाला लावले जातात. त्याचा उपयोग कोकणातील शेतकर्यांना होत नाही. या योजनांच निशकर्ष कोकणसाठी वेगळे असावेत, काजूला हमीभाव मिळावा, आंबा पिकावर होणार्या रोगांचा प्रदुर्भाव रोखण्यासाठी नवीन संशोधन करावे. ते शेतकर्यांपर्यन्त वेळेत पोहचवावे. फणस लागवडीत आधुनिक तंत्रज्ञान वापरावे अशा सुचाना कोकणातील शेतकर्यांनी केल्या. त्याचा विचार नवीन कृषि धोरण तयार करताना जरूर केला पाहिजे.

या परिसंवादात शेतकर्यांनी कोकण कृषि विद्यापीठाच्या कामकाजबाबत नारजी व्यक्त केली. शेतकरी आणि विद्यापिठ यांच्यात अतर आहे. विद्यापिठ जे संशोधन करते शेतकर्यांपर्यन्त वेळेत पाहचत नाही. त्यामुळे त्याचा उपयोग शेतकर्यांना होत नाही अशी टिका शेतकर्यांनी केली. ही वस्तूस्थिती आहे. कृषि विद्यापीठाचे संशाधन शेतकर्यांपर्यत वेळेत पोहचत नाही. त्यामुळे त्याचा फायदा शेतकर्यांना होत नाही. यासाठी कृषी विभागाने कोकण कृषि विद्यापीठ आणि शेतकरी यांच्यात समन्वय साधला पाहिजे.

कोकणातील आंबा पिकावर गेल्या काही वर्षांपासून तुडतुड्या आणि फुलकिड्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. प्रचलित किटक नाशकांचा त्याच्यावर परिणाम होतांना दिसत नाही. त्यामळे आंब्याचे पिकात काही ठिकाणी ५० टक्केहून अधिक घट होत आहे. कोकण कृषी विद्यापिठाला या संदर्भात संशोधन करून मार्गदर्शन करण्याची मागणी केली असूनही त्याबाबत कुठलेच सहकार्य मिळत नसल्याची तक्रार शेतकर्यांनी केली. कृषी विद्यापिठाचे शास्त्रज्ञ विद्यापिठात बसून राहण्यापेक्षा आंबा बागायतीमध्ये येऊन काम करायला हवे अशी तरच तेथील संशोधनाचा कोकणातील आंबा बागायतदारांना फायदा मिळू शकेल . यासाठी कृषि विभागाने देखील पुढाकार घ्यायला हवा.

बाहेरच्या देशातील काजु स्वस्त दरात उपलब्ध होत असल्याने, कोकणातील काजूबागायतदारांचे नुकसान होत आहे. त्यामुळे कोकणातील काजु पिकाला शासनाने हमी भाव द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. कोकणात १ लाख ७६ हेक्टर लागवड क्षेत्र लागवडीखालील क्षेत्र आहे. दरवर्षी साधारणपणे २ लाख ९८ हजार ६२४ मेट्रीक टन काजुचे उत्पादन होते. काजुची सरासरी दर हेक्टरी उत्पादकता १ लाख ७० हजार मेट्रीक टन आहे. कोकणात चांगल्या दर्जाच्या काजुचे उत्पादन होत असले तरी शासनाच्या काजु आयात धोरणांचा फटका काजु उत्पादकांना सहन करावा लागत आहे.

काजुगरांच्या आयातीवरील शुल्कात २०१७ मध्ये मोठी कपात करण्यात आली. त्यामुळे अफ्रीका खंडातील देशांमधून काजूची आयात मोठ्या प्रमाणात सुरू झाली. हा काजु अतिशय कमी दरात उपलब्ध होऊ लागला. त्यामुळे कोकणात उत्पादीत होणार्या चांगल्या काजुच्या खरेदीकडे प्रक्रीया उद्योगांनी पाठ फिरवण्यास सुरुवात केली. ज्यामुळे बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. काजुला इतर पिकांप्रमाणे हमी भाव द्या आणि काजु आयात संदर्भात धोरण ठरवावे अशी मागणी कोकणातील काजु उत्पादक शेतकर्यांनी कृषी मंत्र्यांकडे केली.

एक किलो काजु उत्पादनाला १२५ रुपये खर्च येतो. मात्र आज शेतकर्यांना १०० रुपयेही मिळत नाही. त्यामुळे काजुला किमान १५० रुपयांचा हमी भाव मिळावा अशी मागणी केली जात आहे. गोवा सरकार काजू उत्पादकांना विशेष अनुदान देते. त्याच धर्तीवर राज्यसरकारनेही अनुदान द्यावे अशी मागणी काजु उत्पादकांनी केली . काजू प्रक्रिया उद्योगास सवलतीच्या दरात पतपुरवठा व्हावा अशी मागणी काजु बागायतदारांनी केली आहे. सध्या काजुगर उद्योगास कच्च्या मालाच्या खरेदीसाठी प्रकल्पाच्या ६० टक्के पर्यंत भांडवल गुंतवावे लागते. मात्र त्यासाठी बँका कर्ज पुरवठा करत नाहीत. फक्त यंत्रखरेदीची किंमत कर्ज पुरवठा करतांना ग्राह्य धरली जाते, त्यामुळे कच्च्या मालाच्या खरेदीसाठी लागणार्या भांडवलासाठी बँकांनी सवलतीच्या दरात कर्जपुरवठा करण्याची मागणी काजु उत्पादक संघकाडून केली जात आहे. कोकणातील फणस, नारळ, सुपारी यांबाबत देखील शेकर्यांनी सुचना केल्या. त्या सुचनांचा विचार शासनाने केला पहिजे. कोकणा फणस मोठ्याप्रमाणावर होतो. त्यो असच पडून राहतो. फणसाच्या नवीन जाती शोधून फणसाचे उत्पादन वाढवून कोकणात गर्यांवर प्रक्रीया करणारे उद्योग सुरू करावेत अशा सुचना करण्यात आल्या. त्याचा विचार केला गेला पाहिजे.

## बदलते तंत्रज्ञान

### दुचाकीचा टायर प्रेशर किती दिवसांनी तपासावा?

आज अनेक जण रोजच्या प्रवासासाठी दुचाकी चालवतात. दुचाकी चालवणे अधिक सोयीस्कर वाटते. ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत दुचाकीचे महत्त्व वाढत आहे. वाहतूक कोंडीपासून आणि लहान मोठ्या रस्त्यांवरून प्रवास करताना दुचाकी अधिक फायदेशीर ठरते. आजच्या या जगात, दुचाकीमध्ये अनेक बदल आणि नवीन फीचर्स दिसून येतात. सुरक्षेशी संबंधित अनेक नवीन फीचर्स दुचाकीमध्ये अपडेट केलेले दिसून येतात.



खूप जास्त वाहतूक कोंडी आणि लहान रस्त्यांमुळे अनेक दुचाकीच्या टायरमधील एअर प्रेशर कमी झालेले दिसून येते. याचा थेट परिणाम मायलेजवर पडतो. त्यामुळे एका ठराविक काळानंतर टायर प्रेशर चेक करणे महत्त्वाचे आहे. यामुळे दुचाकी चांगली मायलेज देते. तुम्ही दर किती दिवसांनी तुमच्या दुचाकीचा टायर प्रेशर चेक करता? आज आपण त्याविषयी जाणून घेणार आहोत तसेच टायर प्रेशर तपासण्याचे फायदे सुद्धा जाणून घेणार आहोत.

आपण ७ ते १० दिवसांमध्ये एकदा टायर प्रेशर तपासणे आवश्यक आहे. याशिवाय काही लोक नियमित दुचाकीने दूरचा प्रवास करतात आणि रस्त्यात खराब रस्त्यावरून जावे लागते त्यांनी आठवड्यातून एकदा दुचाकीचे टायर प्रेशर तपासावे. यामुळे तुम्ही सुरक्षित प्रवास करू शकता.

दुचाकीचे टायर प्रेशर योग्य असेल तर इंधनची कार्यक्षमता वाढते. ज्यामुळे तुमची दुचाकी चांगली मायलेज देऊ शकते. याशिवाय योग्य टायर प्रेशर असल्याने रस्त्यावर दुचाकीची ग्रिप चांगली राहते आणि गाडी घसरून पडण्याचा धोका कमी होतो.

याशिवाय टायरमध्ये कमी प्रेशर असेल तर टायर फुटू शकतो. त्यामुळे दुचाकीमध्ये कंपनीने सुचविलेल्या पीएसाय नुसार हवा भरावी.

जर तुम्ही कुठे बाहेर फिरायला जात असाल तर दुचाकीचे टायर प्रेशर तपासून घ्यावे, ज्यामुळे तुम्ही सुरक्षित प्रवास करू शकता.

वाहन चालवताना काळजी घेणे गरजेचे आहे. सर्तकता बाळगल्यास अपघात टाळता येतात. अन्यथा स्वत:सह इतरांनाही हानी पोहचू शकते.

# चतुरस्र अभिनेत्री जयश्री गडकर

'जयश्रीच्या अभिनयाची तुलना करायचीच झाली, तर ती लताच्या गाण्याशीच करावी लागेल. संगीत क्षेत्रात लताचे जे श्रेष्ठत्व आहे, ते श्रेष्ठत्व जयश्री गडकरने अभिनय क्षेत्रात संपादन केले आहे' असे मत दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांनी जयश्री गडकर यांच्याविषयी व्यक्त केले होते. कारवार जिल्ह्यातील सदाशिवगड तालुक्यातील कणसगिरी या गावी २१ फेब्रुवारी १९४२ मध्ये जयश्री गडकर यांचा जन्म झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचे बालपण गेले. वयाच्या पाचव्या–सहाव्या वर्षीच त्या मुंबईत आल्या. मुंबईत खेतवाडीतल्या महानगरपालिकेच्या शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पुढे गिरगावच्या राममोहन हायस्कूलमधून त्यांनी शालान्त परीक्षा दिली. शिक्षणाची आवड असूनही त्यांना फार शिक्षण घेता आले नाही. मात्र लहानपणापासून त्यांना गाण्याची आवड होती. ताल–सुरांचे उपजत ज्ञान होते आणि गळाही गोड होता.

जयश्री गडकर यांनी १९५० – १९५४ या काळात हौशी रंगभूमीवर कामे केली. याच काळात त्या शास्त्रीय नृत्यही शिकल्या. जयश्री गडकर यांनी सुरुवातीच्या काळात राजकमल कलामंदिरात नोकरी केली.याच काळात व्ही. शांताराम यांना आपल्या 'झनक झनक पायल बाजे' (१९५५) या



**निमित्त**

चित्रपटासाठी एका समूहनृत्यात सहनर्तिका हव्या होत्या. संध्या या चित्रपटाची नायिका होत्या. व्ही. शांतारामसारखे दिग्दर्शक आणि सप्तरंगी हिंदी चित्रपट या आकर्षणामुळे त्यांनी या चित्रपटात समूहनृत्यातून आपली नृत्यकला सादर केली. या नृत्याने त्यांना 'दिसतं तसं नसतं' या चित्रपटात एका नृत्यासाठी काम मिळाले. मात्र केवळ नृत्य करण्याइतकी भूमिका करायची नाही, असे त्यांनी या चित्रपटानंतर ठरवले. यानंतर 'गाठ पडली ठका ठका' या चित्रपटात नायिका म्हणून त्यांना प्रथमच भूमिका मिळाली. २१ मार्च १९५६ या दिवशी त्या नायिका म्हणून पडद्यावर आल्या, याच दिवशी योगायोगाने त्यांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केली. १९५७ साली फिल्मिस्तानच्या 'आई मला क्षमा कर' आणि 'पहिलं प्रेम' या चित्रपटातून त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. फिल्मिस्तानचा पहिला चित्रपट होता 'आलिया भोगासी'. या चित्रपटात जयश्री गडकर यांनी राजा गोसावींबरोबर प्रमुख भूमिका केली आणि नंतरच्या कारकिर्दीत राजा गोसावींबरोबर त्यांनी अनेक चित्रपटांतून नायिकेच्या भूमिका केल्या, त्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या.

यानंतर 'चेतना चित्र'चा चित्रपट प्रदर्शित झाला. 'सांगत्ये ऐका' (१९५९) या चित्रपटात जयश्री गडकर यांनी तमासगिरिणीची भूमिका रंगवली. हा चित्रपट मराठीतला सर्वात जास्त चालणारा चित्रपट ठरला. त्यातल्या 'बुगडी माझी सांडली गं...' या लावणी नृत्याने जयश्री गडकर यांना मराठी चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट नृत्यांगना म्हणून कायमचे स्थान मिळाले. चित्रपट रसिकांना ही लावणी अजूनही भुरळ घालते. जयश्री गडकर यांनी जवळपास पन्नास वर्षे मराठी चित्रपटसृष्टीत अधिराज्य गाजवले. तमाशापटांबरोबरच अनेक कौटुंबिक, भावनाप्रधान, विनोदी, ऐतिहासिक चित्रपटांतूनही त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. एक चतुरस्र कलाकार म्हणून त्यांनी मराठी चित्रपटात आपला अमीट ठसा उमटवला.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### रताळे सोलून खाताय? मग करताय खूप मोठी चूक



तुम्ही रताळे खाण्यापूर्वी ते सोलता का? रताळ्याची साल म्हणजे निसर्गाचं स्वतःचं संरक्षण कवच. ते केवळ रताळ्याच्या आतल्या भागाला ओलसर आणि ताजे ठेवत नाही तर त्यात आवश्यक पोषक तत्वेदेखील असतात, जी अनेकदा सोलल्यावर वाया जातात. आरोग्य फायदे

**प्रीबायोटिक्स आणि फायबर–समृद्ध :** रताळ्याच्या सालीमध्ये खूप फायबर्स असतात, जे आपल्या आतड्यांतील बॅक्टेरियांना पोषण देतात, पचन सुधारतात आणि जास्त काळ आपले पोट भरलेले ठेवतात. सोललेल्या रताळ्याच्या तुलनेत मध्यम आकाराच्या रताळ्यामध्ये जवळजवळ दुप्पट फायबर असते.

**अँटिऑक्सिडंट :** रताळ्याच्या सालीमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जसे की फिनोलिक कंपाउंड्स आणि फ्लेवोनॉइड्स, जे फ्री रॅडिकल्सशी लढायला मदत करतात. यामुळे दाहकता कमी होते आणि एकूणच आरोग्याला मदत होते.

**व्हिटॅमिन बूस्ट :** रताळ्याच्या सालीत आतल्या भागापेक्षा अधिक व्हिटॅमिन उ आणि ए असतात, जे त्वचा आरोग्य आणि रोगप्रतिकारक वाढवण्यास मदत करतात.

**खनिज शक्ती :** रताळ्याच्या सालीमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि मँगनीजसारखी आवश्यक खनिजे असतात, जी हृदयाच्या आरोग्यासाठी आणि स्नायूंच्या कार्यासाठी महत्त्वाची असतात.

**१. भाजलेले रताळ्याचे वेजेस :** संपूर्ण रताळ्याच्या वॅजेस ऑलिव्ह ऑइल, पेपरिका आणि रोझमेरीमध्ये मिसळा.. त्यांना कुरकुरीत होईपर्यंत भाजा आणि तुम्हाला तुम्ही सालं खाताय याची जाणीवही होणार नाही – ते एक सुंदर कुरकुरीतपणाचा अनुभव देतात!

**२. सूपमध्ये भर घालणे :** सुपासाठी रताळ्याचे सालासह लहान चौकोनी तुकडे करा. साले टेक्चर वाढवतात आणि पोषक तत्वे वाढवतात.

**३. रताळे नट बटर :** एक क्रीमी बटर बनवण्यासाठी रताळे त्यांच्या सालासह वाफवून त्यात आल्मंड बटर, दालचिनी आणि खजूर घाला. तुमचं स्वीट नट बटर तयार आहे.

**४. स्किन चिप्स :** रताळे बारीक कापून त्यावर ऑलिव्ह तेल आणि मसाले घालून भाजा किंवा बेक करा, जेणेकरून हेल्दी चिप्स तयार होतील.

# माथेरानमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**माथेरान : बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीचा उत्सव माथेरान शहरात साजरा करण्यात आला. माथेरान गिरीस्थान नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांच्या हस्ते उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास अभिवादन करुन कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

नगर परिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.यावेळी मुख्याध्यापक दिलीप अहिरे,शिक्षक लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम,मनिषा चौधरी, किरण शिंदे, शिक्षण समिती पालक संघ अध्यक्षा ज्योती शिंदे, कल्पना पाटील अंकुश इचके, सदानंद इंगळे, ज्ञानेश्वर सदगीर, अन्सार महापुळे आदी उपस्थित होते.



## ज्योती म्हात्रे यांना उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार

**अलिबाग :** रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे दरवर्षी उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षीचा हा पुरस्कार प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय व तालुका ग्रंथालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांना जाहीर करण्यात आला आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.७५/७५/२०२५ दिनांक : २०/०२/२०२५

**निविदा सूचना**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | PMC/WS/63/2024-25 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानातील सबमर्सिबल पंपाची देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.२०,०२,४३२/- |

वरील ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २१/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(कैलास गावडे)
अतिरिक्त आयुक्त (१)
पनवेल महानगरपालिका



**TENDER NOTICE**

Sealed offers for the following work at Tulsi Heights CHSL, Kamothe, Navi Mumbai are invited from the Reputed, experienced, registered channel partners of MNRE /MEDA /SECI /DISCOM under grid connected rooftop solar Photovoltaic power plants programme.

| Sr. No. | Name of work | EMD (Rs) | Time Limit | Cost of Tender (Rs) |
|---|---|---|---|---|
| 1. | Design, Supply, Installation, Testing and Commissioning with 5 year CMC of 100KW grid connected rooftop solar photovoltaic power plant. | 1,00,000/ | 90 Days | 1,500/- |

The Blank tender forms will be issued from 24/02/2025 to 02/03/2025 in the society office of **Tulsi Heights Co-Op Housing So ciety Ltd., Kamothe, Navi Mumbai.** Interested Bidders can conduct site survey and attend Prebid meeting on 03/03/2025 at 16:00. The sealed Tender will be received in the society office on 08/03/2025 upto 16.00.

Tulsi Heights reserves the right to reject one or all Tenders or any item/items of the Tender without assigning any reason there to.

Date : 20/05/2025

Ref.No.: THCHSL/046/Paper Notice/2024-2025

Sd/- Chairman Sd/- Secretary Sd/- Treasurer

**TULSI HEIGHTS CO-OP HSG. LTD.**
Plot No. 25, Sector 22, Kamothe,
Navi Mumbai - 410 209.
Email : tulsiheights.chs2014@gmail.com


## गोवे येथे किसान आयडी शिबिर



**धाटाव : प्रतिनिधी**

दीपक फाऊंडेशन व दीपक नायट्राईट तसेच गोवे ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने संगाथ प्रकल्पांतर्गत गोवे ( ता.रोहा) ग्राम पंचायत येथे एकदिवसीय शासकीय योजनाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात ४० शेतकऱ्यांचे किसान आयडी कार्ड नोंदणी करण्यात आले. या शिबिराला ग्रामस्थांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

या वेळी गोवे, मुठवली ,शिरवली येथील शेतकऱ्यांनी शिबिराचा लाभ घेण्यासाठी गर्दी केली होती. या वेळी सरपंच महेंद्र पोटफोडे, ग्राम सेवक गोविंद शिद, व ग्राम पंचायत सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.दीपक फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक प्रविण ठोसर, पर्यवेक्षक अमृता गोरीवले, फॅसिलेटर शनिता मांजरे, यांनी शिबिरात शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती दिली.

## माणगावमध्ये रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमधील शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेच्या वतीने के.ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने शिवजयंतीनिमित्त बुधवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या महारक्तदान शिबिरात १६४ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. उद्घाटन माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप यांच्य हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे व रक्तदात्यांचे, वर्गणीदार, देणगीदार, माणगाव विवा कॉलेज, माणगाव जनरल नर्सिंग कॉलेज यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सलीम शेख, रक्तदान शिबीर समिती अध्यक्ष जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे व सर्व सहकारी पदाधिकारी व सभासद यांनी स्वागत करून सर्वांचे विशेष आभार व्यक्त केले.

शिबिरात माणगाव विवा कॉलेज, माणगाव जनरल नर्सिंग कॉलेज, चारिझेन फाउंडेशन, संस्थेचे कायदेशीर सल्लागार अॅड. भालचंद्र खाडे, नवरात्र मित्रमंडळ माणगाव यांनी विशेष सहकार्य केले. या शिबिराचे अनेकांनी कौतुक केले.


सिडको शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात/ करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी / करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी / संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **नोड – द्रोणागिरी** | | | | | | | | |
| १ | द्रोणागिरी १६९१ | म्हातवली ७/८३<br>नागाव १७<br>नागाव ८७/ २१८/२<br>नागाव ४/८१<br>**एकूण संपादित क्षेत्र** | २३/०<br>४८/३+४<br>६६/५ब<br>४५अ/३ब<br>५२/५ | २-२७-०<br>०-३०-१<br>१-२२-०<br>०-११-६<br>०-०४-०<br>**३-९४-७** | ३४५० चौ.मी. पैकी २३०० चौ.मी. प्रस्तावित | मौजे द्रोणागिरी, सेक्टर - ४६A, भूखंड क्रमांक २, क्षेत्र - २२९९.७५ चौ.मी. | **मूळ भूधारक –**<br>**कै. रुक्मीनी द्वारकानाथ काठे (मयत) मृत्यू दिनांक १८.१०.१९८७ व जयवंत द्वारकानाथ काठे (मयत) मृत्यू दिनांक १८.०३.१९७९**<br>**वारस दाखला क्र. सी.एम.ए. क्र. ६८/१९९७**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ६८/१९९७ यांचे वारस**<br>१) श्रीमती जयश्री जयवंत काठे<br>२) श्रीमती जयश्री जगदीश तांबोळी<br>३) श्रीमती शुभांगी सुभाष माळी<br>४) श्री. ज्ञानेश्वर जयवंत काठे<br>५) श्री. मोहन जयवंत काठे<br>६) श्री. प्रमोद जयवंत काठे<br>**कै. रुक्मीनी द्वारकानाथ काठे (मयत) मृत्यू दिनांक १८.१०. १९८७ व जयवंत द्वारकानाथ काठे (मयत) मृत्यू दिनांक १८.०३. १९७९**<br>**वारस दाखला क्र. सी.एम.ए. क्र. ५४/२०१६**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ५४/२०१६ यांचे वारस**<br>१) श्रीमती जयश्री जयवंत काठे<br>२) श्रीमती जयश्री जगदीश तांबोळी<br>३) श्रीमती शुभांगी सुभाष माळी<br>४) श्री. ज्ञानेश्वर जयवंत काठे<br>५) श्री. मोहन जयवंत काठे<br>६) श्री. प्रमोद जयवंत काठे<br>**जयश्री जयवंत काठे (मयत) मृत्यू दिनांक ०६.१०.२०१७**<br>**वारस दाखला क्र. सी.एम.ए. क्र. १५३/२०१९**<br>**दिवाणी चौकशी अर्ज क्र. १५३ /२०१९**<br>**यांचे वारस**<br>१) श्री. मोहन जयवंत काठे<br>२) श्रीमती जयश्री जगदीश तांबोळी<br>३) श्रीमती शुभांगी सुभाष माळी<br>४) श्री. ज्ञानेश्वर जयवंत काठे<br>५) श्री. प्रमोद जयवंत काठे | रे.मु.क्र. ९/१९८३ मधील न्यायनिर्णयानुसार हिश्शेवाटणी करण्यात आली आहे. स्पेशल ठिकाणी दावा क्र. १७/१९८६ मधील न्यायनिर्णयानुसार |
| **ता. पनवेल. जि. रायगड** | | | | | | | | |
| २ | उलवे १०३३ | गव्हाण २३७ | ९१/२ | ०-१५-९ | १५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ६G , सेक्टर - २२, क्षेत्र- १४९.८७ चौ.मी. | **मूळ भूधारक –**<br>**कै. शंकर जयराम देशमुख(मयत), कै. मधुकर जयराम देशमुख (मयत) व कै. सुशिला अनंत देशमुख (मयत) यांचे वारस**<br>श्रीमती वैजयंती जयराम देशमुख, श्री. महेश अनंत देशमुख, श्रीमती सिमा अनंत देशमुख, श्रीमती सुशिला अनंत देशमुख, श्री. रमाकांत शंकर देशमुख, श्री. दिलीप शंकर देशमुख, श्रीमती विजयप्रभा मधुकर देशमुख, श्री. देवेंद्र मधुकर देशमुख, श्री. प्रसाद मधुकर देशमुख, श्रीमती भारती जयंत चव्हाण | रे.मु.क्र. ९/१९८३ मधील न्यायनिर्णयानुसार हिश्शेवाटणी करण्यात आली आहे. स्पेशल ठिकाणी दावा क्र. १७/१९८६ मधील न्यायनिर्णयानुसार |
| ३ | उलवे १७३२ | ओवळे ९१<br>पाडेघर ३२<br>पाडेघर ३२ | १७९+१८० +१८२+ १८४/२<br>४०अ/५<br>४१अ/१<br>४२ब/०<br>४२क/६ | ०-३५-०<br>०-२-२<br>०-४-५<br>०-४-५<br>०-३३-० | ६५० चौ.मी. पैकी २०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.B-११, सेक्टर - १५, क्षेत्र -१९९.९२ चौ.मी. | **रे.मु.क्र. २१०/२०१४ या दाव्यामधील दि. २२.०४.२०१७ रोजीच्या मा. न्यायालयीन निर्णयानुसार भूधारक कै. उमाबाई जानबा कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती मोहनी मोहन पाटील उर्फ गुलाब जानबा कोळी.<br>२) श्रीमती पार्वती जानबा कोळी<br>३) विजय जानबा कोळी | **रे.मु.क्र. २१०/२०१४** |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा/वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/४६५/२०२४-२५



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E-Tender-45/2024-25 Dtd.21.02.2025 **RFx No. –** 7000035359 | **Sub:-**Invitation of SRM E-Tender for Removal of Grass (Kashed) under the corridor of 220kV/100kV EHV Lines under EHV (O&M) Division Mahad. | Rs.4,95,963/- (including GST + 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech//E-Tender-01/2025-26 Dtd.21.02.2025 **RFx No. – 7000035373** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for providing Housekeeping Services in the premises of EHV (O&M) Division office Mahad,220kV Mahad Substation control room & Staff quarters colony,220kV Kandalgaon Substation & Staff quarters colony,220 k Vilebhagad Substation,100 kV Roha Substation & colony,100 kV Mhasala Substation & colony and 100 kV Mangaon TSS under EHV (O&M) Division Mahad for the year 2025-26. | Rs.7,86,064/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 21.02.2025 @ 00:00 hrs to 07.03.2025 @23:59Hrs for above tender
for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**



**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीरात सूचना क्र. ७ सन २०२४/२०२५** दिनांक १८/०२/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामाच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं./ मा.स. दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं. कार्यालयाची दुरुस्ती करणे | रु. २२६५२६/- मा. सभा १५/०१/२०२५ **ठराव नं. ८४ (१२)(१)** | २२६५/- | ५०० | २८/०२/२०२५ | १ महिना | ग्रामनिधी |
| २ | गुळसुंदे उर्ध्वस्तर पाणी साठवण टाकी दुरुस्ती करणे. | रु. २९४२२४/- मा. सभा १५/०१/२०२५ **ठराव नं. ८२ (१)** | २९४२/- | ५०० | २८/०२/२०२५ | १ महिना | ग्रामनिधी |
| ३ | गुळसुंदे/आकुळवाडी/ लाडीवली नाम फलक इलेक्ट्रीक वर्क करणे. | रु. १५७९०७/- मा. सभा १५/०१/२०२५ **ठराव नं. ८४(१२)(२)** | १५७९/- | ५०० | २८/०२/२०२५ | १ महिना | ग्रामनिधी |
| ४ | लोना कंपनी ते लाडीवली बसस्टॉप पाईपलाईन. | रु. १४४९४४/- मा. सभा १५/०१/२०२५ **ठराव नं. ८४(१२)(३)** | ११४९/- | ५०० | २८/०२/२०२५ | १ महिना | ग्रामनिधी |

१. निविदा मिळणेकरिता दि. २१/०२/२०२५ ते २५/०२/२०२५ पर्यंत लेखी अर्ज/नोंदनिकृत ठेकेदाराने सादर करणे. दिनांक २७/०२/२०२५ ते ०३/०३/२०२५ (सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
२. (१) १% इसारा रक्कम (२) ठेकेदार नोदणी प्रमाणपत्र (३) GST पत्र व इतर सोबत जोडलेली सिलबंद निविदा **दि.४/०३/२०२५** रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील.
३. दि. ४/०३/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता समक्ष उघडणेत येतील.
४. म. ग्रा. पं. लेखासहिता २०११ कलम ४५ (२) अन्वये विकास काम first call कमीतकमी ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Second Call ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Third Call २ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Fourth call १ नोंदणीकृत ठेकेदार, वैध असेल.
५. इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने) चेक ठेकेदाराकडून आलेला असणे आवश्यक आहे.
६. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७. सदर कामाचे अदाज पत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
८. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
९. निविदा फॉर्म किंमत ना परतावा राहील.
१०. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, २% GST १% लेबर इन्सुरन्स १% उपकर कपात केली जाईल.
११. २५००००/- पर्यंम २ % GST ग्रा.पं. कट करील तर २५००००/- वरील रक्कमेला एकूण १८% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१२. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्या कडून जादा ५% GST कट करून घेण्यात येईल.
१३. वर्क ऑडर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबधितास जबाबदार राहावे लागेल
१४. झालेल्या तात्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्ध ते नुसार देयके अदा केली जातील. (अदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल)
१५. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१६. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१७. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारदेवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१८. सुरक्षा अनामत रक्कम अतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणी नुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९. काम पूर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अतिम बिले दिली जाणार नाही.
२०. सोबत दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे
२१. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२२. निविदा ओपनिंगच्या दिवशी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार हजर असणे आवश्यक आहे.
२३. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२४. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.
२५. ठेकेदारणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२६. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणे बाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील
२७. एक किंवा सर्व निविदा ना मंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२८. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.
२९. एखाद्या कामाची निविदा लिफाफा ३ पेक्षा कमी आल्यास संबधित ठेकेदारांनी ओपन करू नका असा आग्रह धरल्यास सदरचा लिफाफा ओपन न करण्याबाबत विचार केला जाईल.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

**सही/-**
**मिनाक्षी भास्कर जगताप**
**सरपंच,**
ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे

## निवडक

### कर्जाच्या बहाण्याने अनेकांना गंडा

**नवी मुंबई :** खारघर परिसरातील या व्यक्तीने सीबीडी परिसरातील अनेकांना गंडा घातला आहे. त्याने तो एका बँकेत बिजनेस हेड पदावर कार्यरत असल्याचे सांगितले होते. बँकेतून कोणत्याही मिळवून देतो, असा विश्वास त्याने निर्माण केला होता. त्यामुळे एका व्यक्तीने पाच कोटींच्या कर्जासाठी ५६ लाख रुपये दिले होते. एका व्यक्तीने एक्काव्य व्यवसायात मदतीसाठी ८९ लाख रुपये दिले होते. त्यासह इतरही काही व्यक्तींनी वेगवेगळ्या कामांसाठी त्यांना पैसे दिले होते. एकाला कर्ज मंजुरीचे पत्रही दिले होते, मात्र ते पत्र बनावट असल्याचे काही दिवसांनी समोर आले. या व्यक्तीने आपली फसवणूक केल्याचे संबंधितांच्या लक्षात आले.

### सत्याग्रह महाविद्यालयात शिवजयंती

**नवी मुंबई :** खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या शांताबाई रामराव सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजाच्या जयंती महोत्सवाचे आयोजन प्रा. डॉ. जी.के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. सत्याग्रह जुनिअर कॉलेज, सत्याग्रह कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सदर जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रा नेहा राणे, प्रा. शिवाजी आमटे, प्रा सतीश पवार, प्रा संगीता जोगदंड आदिनी शिवरायांचे जीवनकार्य आपल्या भाषणात विशद केले. या कार्यक्रमात प्रा. अनिल गायकवाड, डॉ.प्रीती शर्मा, प्रा. एलोरा मित्रा, प्रा.बळीराम शिंदे, प्रा. संदीप पांडे, प्रा. ललिता यशवंते यांची विशेष उपस्थिती होती.

### नाईक महाविद्यालयात शिवजयंती

**नवी मुंबई :** एफ.जी.नाईक महाविद्यालय येथे शिवजयंतीचे औचित्य साधून एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमावेळी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक विवेक वारभुवन व्याख्याते म्हणून उपस्थित होते. तसेच एफ.जी.नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रमोद साळुंखे, डॉ.कविता पवार, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



**कामोठे : छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती कामोठे येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त एक शहर एक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते, तर पोलीस ठाण्यासमोरील चौकात विपुल गोवारी यांनी अयोध्यातील राम मंदिराची सात फूट उंच व १३ फूट रूंद प्रतिकृती साकारली.**

# द्रोणागिरी किल्ल्यावर स्वच्छता अभियान

## शिवजयंतीनिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील मेरिट टेक संगणक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांनी शिवजयंतीनिमित्त सरदार हिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन उपक्रमांतर्गत दुर्ग स्वच्छता मोहीम राबवली.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) यांच्या संयुक्त विद्यमाने उरणच्या द्रोणागिरी किल्ल्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात सारथी योजनेतून शिक्षण घेत असलेल्या मेरिट-टेक संगणक प्रशिक्षण केंद्र, उल्वेच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान केले आणि किल्ल्याच्या परिसरातील कचरा हटवून परिसर स्वच्छ केला.

या विशेष कार्यक्रमात किल्ल्यावर आलेल्या हजारो भाविकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात पोवाडे, भजने आदींचा समावेश होता तसेच सर्वांसाठी शिवभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती, हे भोजन तयार करण्यास विद्यार्थ्यांनी सक्रियपणे मदत केली.





या अभियानाच्या माध्यमातून किल्ल्यावर येणाऱ्या सर्व भाविकांना स्वच्छता राखण्याचे आवाहन करण्यात आले. यासाठी किल्ल्याच्या परिसरात विविध ठिकाणी कचरापेट्या ठेवण्यात आल्या आहेत. जेणेकरून पर्यटक कचरा योग्य ठिकाणी टाकून किल्ल्याच्या स्वच्छतेत योगदान देऊ शकतील. मेरिट-टेक संगणक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांच्या या श्रमदान मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वंध्यत्वाच्या समस्येवर मातृत्व चळवळ ही अभिमानाची गोष्ट -रश्मी नांदेडकर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रदूषण, शहरीकरण, मानसिक ताण तणाव, रासायनिक घटकांचे हवेतील वाढते प्रमाण, खाण्या-पिण्याच्या सवयी इतर गोष्टींमुळे हार्मोन्स बदल होत आहेत. यामुळे निर्माण होणाऱ्या वंध्यत्वाच्या समस्या वाढत आहेत. विज्ञान व श्रद्धा यांचा संगम पुरातन काळापासून आहे. आजच्या युगात मदरहुड हॉस्पिटलने मोठी जनजागृती व व्यापक मातृत्व चळवळीचा शुभारंभ केला आहे ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे, असे मत पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी व्यक्त केले.

नवी मुंबईत खारघर येथे मदरहुड फर्टिलिटी आणि आयव्हीएफच्या वतीने नेक्स्ट जनरेशन फर्टिलिटी ट्रीटमेंट सेंटर शुभारंभ सोहळ्यावेळी त्या बोलत होत्या. या वेळी मुख्य संचालक सर्वानन आर, वरिष्ठ आयव्हीएफ मार्गदर्शन डॉ. रिटा मोदी, सेवा संचालक डॉ रुपाली कदम आदी डॉक्टर या वेळी उपस्थित होते.



या शुभारंभावेळी बोलताना, मदरहूड हॉस्पिटल्सचे सीईओ श्री. विजयरत्न वेंकटरमन सांगतात की, मदरहूड फर्टिलिटी आणि आयव्हीएफमध्ये, आम्ही जागतिक दर्जाचे प्रजनन उपचार मिळवून देणार आहोत. आई व बाबा होणे यासारखा आनंद जोडप्यांच्या चेहऱ्यावर पाहताना या चळवळीचे सार्थक झाल्याचे समाधान आम्हाला खूप आनंद देत असते, असे डॉ. रुपाली कदम यांनी या वेळी सांगितले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी व स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि.२०) मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे फॅकल्टी व स्टुडन्ट एक्स्चेज प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.



या फॅकल्टी व स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रामसाठी जेके महाविद्यालयातील (घनसोली) प्रा. सुशांता लहेरी यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना फॉरेन एक्सचेंज मार्केटिंग व डेरिव्हेटिव्ह विषयी मार्गदर्शन केले तसेच या व्याख्यानाचा लाभ सुमारे ३५ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घेतला. मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रा. शिवानी मानकामे यांनी जेके महाविद्यालयात उपस्थित राहून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले तसेच त्यांच्या व्याख्यानाचा लाभ सुमारे २० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घेतला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या फॅकल्टी व स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रॅमचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले विभाग प्रमुख मॅनेजमेंट स्टडीज यांनी केले तसेच प्रा. शगुप्ता शान, प्रा. शितल चव्हाण, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. अर्पिता नायक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# कळंबोलीत आठ फूट लांबीची शिवरायांच्या कट्यारची प्रतिकृती



**कळंबोली : बातमीदार**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवराय यांची जयंती कळंबोलीतील घाटी मराठी संघटनेतर्फे मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. यावर्षी या संघटनेकडून शिवरायांच्या कट्यार ची प्रतिकृती म्हणून आठ फूट लांबीची स्टील ची कट्यार साकारण्यात करण्यात आलेली होती. शिवरायांचे असलेले शौर्य, पराक्रम भावी पिढी समोर आदर्शवत रहावे यासाठीच शिवरायांच्या कट्याराची प्रतिकृती साकारण्यात आली असल्याचे संघटनेचे अध्यक्ष पंकज सूर्यवंशी यांनी सांगितले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास घराघरात पोहोचावा या उद्देशाने घाटी मराठी संघटनेमार्फत विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याचे यावेळी अध्यक्ष पंकज सूर्यवंशी यांनी सांगितले. या संघटनेचे संस्थापक कै.संतोषभाऊ गायकवाड यांच्या प्रेरणेने विद्यमान अध्यक्ष - पंकज सुर्यवंशी, उपाध्यक्ष -किरण गायकवाड़, शैलेश धूमाळ, संदीप जाधव,रोहित खराडे, तुषार जाधव, दत्ता पिसाळ, गणेश थोरात, आबा इंगळे, मंगेश सावंत, गणेश अहिरे, वैभव यादव या शिवप्रेमींकडून शिवजयंतीचे आगळे वेगळे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

संघटनेकडून शिवरायांच्या कट्यार ची प्रतिकृती आठ फूट लांबीची साकारण्यात आली असून शिवप्रेमींना पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहे. शिवरायांच्या कट्यार ची प्रतिकृती वसाहतीमधील या शिवप्रेमींनी मोठ्या मेहनतीने तयार केली आहे. या कट्यारीचे पूजन व अनावरण शिवजन्मोत्सव झाल्यावर नंतर लगेच शिवप्रेमींकडून करण्यात आले.

# सीकेटी विद्यालयात चित्रकला, निबंध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात, पनवेल येथील 'अग्निशमन सेवा सप्ताह निमित्ताने' अग्निशमन केंद्रातर्फे पाचवी ते नववी च्या विद्यार्थ्यांसाठी 'चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद दिला. या स्पर्धेत १२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यापैकी ६ उत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड विद्यालयातर्फे करण्यात आली असून त्यांना पुढील फेरीसाठी पाठविण्यात आले आहे.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी हा उपक्रम राबविल्याबद्दल अग्निशमन केंद्राचे आभार मानले. कार्यक्रमास चित्रकला शिक्षक महेश पोपेटा व इतर सहकारी शिक्षकांनी सहकार्य केले.



# कमळ पतसंस्थेला पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ही रायगड जिल्ह्यातील एक नावाजलेली आदर्श महिला पतसंस्था गेली २९ वर्षे ग्राहकांना उत्तम सेवा प्रदान करीत आहे. संस्थेने केलेली सातत्यपूर्ण प्रगती आणि गुणवत्ता सिध्दतेमुळे कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेला २५ कोटी रुपये ते पुढे या व्यवसाय गटातून २०२४-२५ सालाकरीता प्रथम क्रमांकाचा कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.

१५ व १६ फेब्रुवारी २०२५ रोजी अलिबाग येथे कोकण पतसंस्था भूषण पुरस्कार २०२४-२५ हा समारंभ झाला. समारंभासाठी महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे, निवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे हे उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे तसेच कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघाचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या हस्ते सदर पारितोषकाचे मानचिन्ह कमळ महिला नागरी पतपेढीच्या अध्यक्षा मालती आंग्रे, उपाध्यक्षा पूर्वा खेडेकर, संचालिका मनिषा विसपूते, उर्मिला वंजारी, संस्थेचे प्रशासकीय व्यवस्थापक दीपक राजे तसेच संस्थेचा कर्मचारी वर्ग यांनी स्वीकारला. या पुरस्कारामुळे कमळ महिला पतसंस्थेचा तसेच संस्थेच्या संचालकांचे व संस्थेचे अधिकारी, कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'सीकेटी'च्या चिमुकल्यांकडून शिवरायांना मानाचा मुजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयातील पूर्व प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमामध्ये मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात शिव जयंती मंगळवारी (दि.१८) साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी प्रमुख पाहुण्यांसह उपस्थित सर्व मान्यवराचे यथोचित स्वागत केले. संगीत शिक्षक रुपेश मढवी व तबला शिक्षक संतोष खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पोवाडा व शिववंदना यांचे सादरीकरण केले.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सीकेटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षका स्वाती पाटील, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, सीकेटी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक आनंद कुलकर्णी, पालक संघाच्या प्रतिनिधी सई दरेकर तसेच इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होते.

## क्लिक...क्लिक...!



मुरूड : समुद्रकिनाऱ्यासमोर मानाने उभा असलेला छत्रपती शिवरायांनी बांधलेला पद्मदुर्ग किल्ला हा फ्लोटिंग जेट्टी कधी होईल या प्रतीक्षेत आहे. (छाया : सुधीर नाझरे)



**पनवेल : म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन कार्यालयाला गुरुवारी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत केले. या वेळी युनियनचे समीर ठाकूर, विश्राम म्हात्रे, दत्ता ठाकूर, संदीप पवार, हिम्मत वाघेला, विकी जळे, योगेश कोंडिलकर, योगेश पाटील, विश्वास ठाकूर आदी उपस्थित होते.**

# शिवजयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम

## सरसगड प्रदक्षिणा; ५२ जणांचा सहभाग

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड संघर्ष संस्था मधील तरुणांनी रायगड प्रदक्षिणेप्रमाणे सरसगड प्रदक्षिणा शिवजयंतीला बुधवारी सकाळी ६ वाजता आयोजित केली होती.

यामध्ये सुधागड, पालीसह पुण्यातील तब्बल ५२ लहान मुले, तरुण व प्रौढ असे हौशी व प्रशिक्षित ट्रेकर्सने उत्स्फूर्त सहभाग घेतला. यामुळे सरसगडाच्या भोवतालच्या ऐतिहासिक व नैसर्गिक परिसराची माहिती त्यांना मिळाली. सरसगड प्रदक्षिणेची ही पहिली मोहीम अतिशय उत्तमपणे झाली.

संस्थेतील सदस्य अरविंद दंत, कपिल पाटील, अमित निंबाळकर, प्रदीप गोळे व मिलिंद गोळे यांनी आठवड्यापूर्वी केलेल्या प्राथमिक प्रदक्षिणेमुळे व उत्तम व्यवस्थापनामुळे ही प्रदक्षिणा यशस्वीपणे पार पडली. प्रदक्षिणेकरिता नोंदणी शुल्क व्यतिरिक्त अमोल मोरे, विक्रांत चौधरी, मंगेश लखीमळे, विनय मराठे यांनी आर्थिक सहकार्य केले. तर योगेश सुरावकर यांनी प्रशस्तीपत्र, परेश चौधरी यांनी प्रथमोपचार करिता सहकार्य केले.

प्रदक्षिणा पुर्ण झाल्यानंतर संस्थेकडून चहा, नाश्ता, पाणी, प्रशस्तीपत्र वितरण करण्यात आले.



## माथेरानमध्ये स्वच्छता अभियान

**माथेरान : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त माथेरान पर्यावरणप्रेमींकडून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. माथेरान पॉईंट जंगल परिसरात पर्यटकांकडून फेकण्यात आलेल्या प्लास्टिक बॉटल, खाण्याचे रॅपर व इतर कचरा पर्यावरण प्रेमींकडून गोळा केला.

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमधील अनेक पॉईंट परिसरात भटकंती करताना पर्यटकांकडून पाण्याच्या रिकामी बॉटल, खाऊचे रॅपर अश्या प्रकारचा प्लास्टिक जन्य कचरा जंगल परिसरात फेकला जातो. यामुळे येथील पर्यावरणाला हानी पोहचू शकते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी माथेरानमधील पर्यावरण प्रेमींकडून पॉईंट परिसर स्वच्छता अभियान घेण्यात आले.

या वेळी त्यांनी मंकी पॉईंट आणि हार्ट पॉईंट परिसरात असलेल्या जंगल भागात स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये पर्यावरण प्रेमींकडून जंगलातील प्लास्टिक बॉटल खाऊचे रॅपर तसेच अन्य कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या वेळी एकूण बारा ते पंधरा गोणी प्लास्टिक जन्य कचरा येथे गोळा करण्यात आला.स्वच्छता दूत तथा सामाजिक कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी आणि त्यांच्या सर्व सहकारी टीमने स्वच्छता अभियान राबिविले.



अनेक ठिकाणी शिवजयंती नेहमीच्या उपक्रमांनी साजरी करण्यात आली, परंतु माथेरानमधील पर्यावरणप्रेमींनी आणखी एक पाऊल पुढे टाकत शिवजयंतीनिमित्त स्वच्छता अभियान रावबून एक चांगला संदेश दिला.

## तांबाटी गावात माझी वसुंधरा अभियान



**चौक : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी माझी वसुंधरा ५.० या अभियानाची जनजागृती केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांचे हित जोपासले, ते विज्ञानवादी होते. त्यांनी जसे प्रजेचे हित जोपासले तसेच त्यांनी पिके, वृक्षांचे देखील हित जोपासले. शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस करू नये, असा दंडक दिला होता. पीकपाणी, गवत, लाकूड यांची हत्या म्हणजे मनुष्यवध आहे, अशी शिवाजीराजांची भूमिका होती.

माझी वसुंधरा ५.० अंतर्गत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लागणारी जनजागृती पोस्टर, घोष वाक्य, मिरवणूक यांच्या माध्यमातून केली, यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांची मानवी प्रतिकृती करून मोठी मिरवणूक काढण्यात आली.

सरपंच अविनाश आम्ले, उप सरपंच नितीन कदम, ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम, सदस्य संतोष दळवी हरीभाउ जाधव, ग्रामस्थ, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शिक्षक, शिवप्रेमी, तांबाटी युवक व कर्मचारी उपस्थित होते.

## कांगोरीगडावर पहिल्यांदाच शिवजयंती सोहळा उत्साहात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सडे गावातील कांगोरीगड विकास मंडळा वतीने कांगोरीगड तथा मंगळगडावर पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराजांची जयंतीचा उत्सव सडे गावच्या तरूणांसह विकास मंडळाच्या पुढाकाराने करण्यात आला.

या वेळी ध्वजारोहण पूजन झाल्यानंतर कांगुरनाथ मंदिरात कांगुरमालासह अन्य देवतांची मूर्तीपूजा तसेच शिवप्रतिमा पूजन व आरती करण्यात आली. या वेळी पूजेसाठी गणेश सालेकर आणि श्रध्दा गणेश सालेकर दाम्पत्याने उपवास धरून पूजेचा मान यथाविधी पार पाडला. कांगोरीगडावर प्रसाद तयार करून पूजेनंतर महाप्रसादाचीही तयारी पूर्ण झाली.

यानंतर कृष्णा सणस, सुनील उतेकर, राजू डिगे, गंगाराम सालेकर, राजूशेठ कदम यांनी कांगोरीगडाच्या ऐतिहासिक पार्श्वभुमीसह भविष्यातील गडाच्या प्रगतीसाठी करायचे प्रयत्न याबाबत माहिती दिली. शिवाजी सालेकर यांनी कांगोरीगड म्हणजेच मंगळगडाचा इतिहास सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत सालेकर यांनी केले.





**मोहोपाडा, रसायनी : लोना कंपनीतील कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण होण्यास विलंब होत असल्याने हे कामगार बेमुदत आमरण उपोषणास बसले होते. बुधवारी कामगारांना पनवेल, खालापूर, रसायनीतील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करून मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कामगारांनी उपोषण स्थगित केले.**

## निवडक

### साळाव येथे आरोग्य तपासणी




**मुरुड :** जिंदल विद्या मंदिर, साळाव आणि संजीवनी हॉस्पिटल, जे.एस.डब्ल्यू. डोलवी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष आरोग्य तपासणी व समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले. संजीवनी हॉस्पिटल, जे.एस.डब्ल्यू. डोलवी येथील डॉ. कल्याणी मोरे आणि डॉ. सागर यादव यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना आरोग्यविषयक महत्त्वाचे सल्ले दिले. यासोबतच, विद्यार्थ्यांसाठी गटानुसार विशेष समुपदेशन सत्रांचे आयोजन करण्यात आले. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर सर व उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, आयोजक व तज्ज्ञांचे आभार मानले.

### शिवरायांना मुरूडमध्ये मानवंदना



**मुरूड :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श कल्याणकारी राजा, जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुरुड– जंजिरा नगर परिषदेच्या वतीने नगर परिषद कार्यालय, लक्ष्मीखार व दत्तवाडी येथे महाराष्ट्राचे राज्य गीत सादर करुन शिवरायांना मानवंदना देण्यात आली. या वेळी प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आबंतेकर, सतेज निमकर, प्रशांत कासेकर, आदेश दांडेकर, नायब तहसीलदार संजय तवर, प्रमोद भायदे, राकेश पाटील, कपिल वेहेले, अनिकेत जगदाळे, सोनल पाटील, अभिजित चांदोरकर, सुदेश माळी, सतिष जंजिरकर, दीपक शिंदे, स्वप्नजा विरकुड, शुभ्रा कारभारी, नम्रता करडे, स्मिता मुरूडकर आदी उपस्थित होते.

### मोरे महाविद्यालयात व्याख्यान



**रोहे :** एम.बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या कला शाखेमध्ये भूगोल विभाग हा शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२पासून कार्यरत आहे. भूगोल विभागातर्फे नवीन शैक्षणिक धोरणानुसार भूगोल विषयातील बदल आणि त्यातून प्राप्त होणाऱ्या संधी’ या विषयी प्राध्यापक डॉ. समीर अरुण बुटाला, सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान सोमवारी महाविद्यालयात आयोजित करण्यात आले. संस्थेचे संचालक अशोक मोरे, प्रा.हणमंत ढवळे, प्रा. अक्षता ठाकूर, प्रा. रमा देशमुख उपस्थित होते. व्याख्यानाचे आणि प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा. दर्शना शिंदे, सहकारी प्रा. प्रज्ञा शिर्के यांनी केले.

# महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत होत आहे. हे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. या संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक हात मदत करत आहे. शासनही याला पाठबळ देत आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

**माझ्या मराठीचे बोलू कौतुके**
**परी अमृतातेही पैजा जिंके**

या शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी मराठी भाषेचे कौतुक केले आहे. मराठी भाषा ८० टक्के संस्कृत आणि २०टक्के इतर भाषेपासून तयार झालेली आहे. आपल्या भारतात अनेक भाषा बोलल्या जातात त्यापैकी २२ अधिकृत भाषा आहेत.त्यातीलच मराठी ही एक भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे १४ कोटी आहे.मराठी मातृभाषा असणार्या लोकांच्या संख्येनुसार मराठी जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून आपल्याकडे मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतातील बोलल्या जाणाऱ्या भाषेपैकी १५० तर बोलीभाषाच आहेत. वर्हाडी, मालवणी, अहिराणी, गोंडी, कोकणी, कातकरी, खानदेशी, ठाकरी, आगरी वगैरे मराठीच्या एकूण ५२ बोली भारतात बोलल्या जातात. जी बोलली जाते ती बोली. पण बोली स्वतःचे असे वेगळे अस्तित्व राखून ठेवते. प्रमाणभाषेची उत्पत्ती ही बोली भाषेतूनच झालेली आहे. विविध प्रदेशात विविध समूहाकडून बोलली जाणारी भाषा म्हणजे बोलीभाषा. बोली ऐकण्यात एक वेगळीच मजा असते. पण जेव्हा आपण आपला प्रदेश सोडून दुसरीकडे जातो तेव्हा आपल्या बोली बोलण्यात काही अडथळे निर्माण होतात. दर बारा कोसावर भाषा बदलते असे म्हणतात, पण कोणती भाषा बदलते? तर बोली भाषा बदलते. बोलीला संस्कृतीचा वेगळा सुगंध असतो. बोली ही प्रादेशिक असते.भाषा प्रमाण असो वा बोली तिथे श्रेष्ठ कनिष्ठ असे काहीही नसते. मग प्रश्न पडतो की प्रमाण भाषा म्हणजे काय? तर प्रमाण भाषा ही सर्वांची एकच असते. सर्वांना समजण्यासाठी, शासकीय व्यवहारासाठी, न्यायालयाची, वृत्तपत्रे, दूरदर्शन या ठिकाणी वापरली जाणारी, सार्वजनिक व्यवहार तसेच लिखित साहित्य निर्मिती यासाठी ठरवलेली ती प्रमाणभाषा होय. पूर्वी संस्कृत ही प्रमाण भाषा होती, पण असं म्हणतात त्या काळच्या व्याकरणकारांनी, ही भाषा बोलायची नाही, ऐकायची नाही असे नियम केल्याने भाषेवर बंधने आली आणि त्याचा परिणाम असा झाला की भाषा बोलण्यातून नष्ट झाली. आता ती फक्त ग्रंथाची भाषा झाली आहे. तर कोणतीही बोलीभाषा जेव्हा बोलण्यातून नष्ट होते. तेव्हा त्या भाषेचे अस्तित्व संपते. पण मग मराठी का टिकली? तर ती मोठ्या प्रमाणावर बोलली जात होती. खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी शब्दकोश तयार करून घेतला आणि मराठी राज्यभाषा बनली.




तर सांगण्याचे तात्पर्य हे की भाषा टिकली पाहिजे म्हणून आपण ती बोलली पाहिजे. आपल्या भाषेचे संवर्धन करायचे तर आपली भाषा, प्रमाण भाषा असो की बोली ती आपण नक्कीच बोलली पाहिजे, पण आज खरोखर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. मराठी भाषेच्या दुरावस्थेला आपण मराठी बांधवच जबाबदार आहोत का? याचा विचार आपणच करायला हवा. आजता गायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्य कृती निर्माण झालेल्या आहेत.अनेक संतांनी आपली ग्रंथ संपदा मराठीतूनच लिहीली आहे.अनेक लेखक, कवी यांनी त्यात सातत्यपूर्ण रितीने भर घातली आहे आणि घालत आहेत. गोवा, गुजरात सारख्या राज्यातही मराठी भाषा काही प्रमाणात बोलली जाते. गोव्यात तर मराठी भाषेला समृद्ध असा इतिहास आहे, मात्र आज मराठी भाषा परकी होत चालली आहे. परदेशी भाषांचे आक्रमण होत असताना आपली मराठी मायबोली लोप तर पावणार नाही ना? याची काळजी करण्याची गरज आहे, मात्र मराठीचा अभिमान बाळगत जास्तीत जास्त संवाद मराठी भाषेतूनच व्हायला पाहिजे. आज परिस्थिती इतकी वाईट आहे की मराठी भाषिकच अधिक प्रमाणात मराठी भाषेची उपेक्षा करताना दिसतात. मराठी भाषेचा वापर करण्याऐवजी इंग्रजी व हिंदी भाषेचा वापर करताना दिसतात. शुद्ध भाषा बोलणे ही तर फार दूरची गोष्ट झाली आहे. अस्सलिखित मराठी बोलणे किती अवघड आहे याचा अनुभव जेव्हा आपण कोणताही इंग्रजी व हिंदी भाषेचा एकही शब्द न वापर करता मराठी बोलण्याचा प्रयत्न करतो ना तेव्हाच येतो. आपल्याला अस्सलिखित मराठी बोलता येत नाही ही शोकांतिका आहे. बरं, महाराष्ट्राची मराठी ही अधिकृत भाषा असूनही शाळा, कॉलेज या ठिकाणीदेखील मराठीची फार मोठी उपेक्षा होते. महाराष्ट्रात मराठी भाषेचा सार्वत्रिक वापर हा खरे तर एक सहज स्वाभाविक विचार आहे. तसेच भाषिक अस्मिता, भाषेचा अभिमान व भाषेचे अस्तित्व या दृष्टीने हा विचार फार महत्त्वाचा आहे आणि म्हणूनच भाषेचा सर्वांगीण वापर हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा ठरतो. तसेच मातृभाषा परिपूर्णतेने पुढच्या पिढीकडे संक्रमित होण्यासाठी देखील सार्वजनिक क्षेत्रात परिपूर्ण भाषा वापर आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा शासकीय अशासकीय अर्ज भरणे इत्यादी कृतींमधून भाषेचा वापर हळूहळू कमी होत जाणे हे भाषाभिमानी कमी होत जाण्याचे, लोकांचे भाषेवरील प्रेम संपत आल्याचे लक्षण असते. त्यामुळे भाषेचा विकास खुंटतो, थांबतो. महाराष्ट्रात आज हे चित्र दिसत आहे.

आज मराठी राजभाषा आहे, पण महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनात मराठीचा परिपूर्णतेने वापर होत नाही ही एक महत्त्वाची समस्या आहे. यामुळे मराठी भाषेची प्रगती थांबली आहे. याची जाणीव शासन, राजकीय पक्ष, सामाजिक सांस्कृतिक संस्था आणि महाराष्ट्रातील जनता यांनी जरूर ठेवायला हवी. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला आहे.मराठी सोबत पाली, प्राकृत, असामी आणि बंगाली या पाच भाषांना सुद्धा अभिजात भाषांचा दर्जा मिळाला आहे. गेल्या अनेक वर्षांची समस्त मराठी भाषिकांची आणि साहित्य रसिकांची मागणी होती की मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा. आपल्यासाठी ही अतिशय अभिमानास्पद अशी घटना आहे. मराठी भाषा अभिजात असा दर्जा मिळाल्यामुळे त्याचे बरेच फायदे भविष्यात आपल्याला होणार आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे मराठी भाषेला आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिकाधिक मान्यता मिळेल तशी आपली मराठी अगोदरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. मात्र अभिजात भाषेचा दर्जामुळे त्याला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मराठी भाषेचा शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात विकास होण्यासाठी शासकीय स्तरावरून अधिक विशेष प्रयत्न केले जातील. मराठीच्या विकासासाठी आता विविध महामंडळाची स्थापना होऊ शकेल. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की आपल्या मराठी भाषेच्या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आणि संवर्धन केले जाईल. अशा रीतीने अभिजात मराठी भाषेमुळे आपल्या मराठी भाषेचा विकासाला प्रचार आणि प्रसाराला वेगळे स्थान प्राप्त होणार आहे.

**तर चला मनाशी निग्रह करू या**
**बोलू या मराठी**
**ऐकू या मराठी**
**जपू या मराठी**
**वाचवू मराठी.....**
**जय हिंद..जय मराठी...**

–संध्या विजय दिवकर, प्रा.शिक्षिका, अध्यक्षा, कोकण मराठी साहित्य परिषद

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the Share Certificate bearing Sr No. 200 of Ten ordinary shares bearing distinctive Nos. **1991 to 2000** Of **NEELKANTH VISWA PH-1 CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, USARLI-KHURD, PANVEL, DIST RAIGAD,** standing in the name of **MR.NILESH DNYANDEV MORE & MRS.JAGRTI MORE Flat No. U-102** has been reported lost/ misplaced and that an application to issue for a Duplicate Certificate in respect thereof has been made to the society at **NEELKANTH VISWA PH-1 CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, USERLI-KHURD, PANVEL, DIST RAIGAD,** to whom objection, if any, against issuance of such duplicate Share Certificates should be made within 15 days from the date of publication of this notice. There is a loan home loan on the aforesaid flat availed from HDFC BANK LIMITED, RAILWAY STATION ROAD, OLD PANVEL BRANCH.

Ref. No.: NVPH1/13/2025
Date : 20/2/2025

**Sd/-**
Secretary

**NEELKANTH WISHWA PH1 CO OP HSG SOC LTD**
**USERLI-KHURD, PANVEL**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५८ | १ | ०–८४–२०<br>पो.ख. ०–०७–१०<br>एकुण ०–९१–३० | ०.७५ | श्री. अशोक नारायण राऊत<br>सौ. कांचन अशोक राऊत |
| २. | ५८ | ३ | ०–७४–१०<br>पो.ख. ०–०४–८०<br>एकुण ०–७८–९० | ८.५६ | श्री. अशोक नारायण राऊत<br>सौ. कांचन अशोक राऊत |
| ३ | ५८ | ६ | ०–६९–८०<br>पो.ख. ०–०९–१०<br>एकुण ०–७८–९० | १०.२६ | श्री. अशोक नारायण राऊत<br>सौ. कांचन अशोक राऊत |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक :– २०/०२/२०२५

**सही/–**
**ॲड. एस. के. राणे**

पत्ता : ऑफिस नं.१२३, पहीला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड, ९८१९८६९२१२

























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com